चाल॥ ॥ स्वामितें म्या बहुश्रमविलें॥ आतांजायअयोध्येतें॥ ऐकाश्रो०॥
११॥ डोंबासंगें मगनृपनाथ॥ गृहित्याचे जात॥ मांसाची दुर्गंधी बहु येत॥ कां
टाळेचित्त॥ ॥चाल॥ ॥ डोंबपत्नीत्यापाहुनिबोलत॥ योग्यनहा दास्य
तें॥ १२॥ ॥श्लोक॥ ॥नववदन तयासीं भूपतो दीनवाणा॥ करिनस
कळकाजा थोर सा नाहिंजाणा॥ तुह्मिमज करितांजी वेंचिल्या द्रव्य राशी॥ सुर
वत नरि माझी कासया नीतु ह्मासीं॥ १३॥ त्यालागीं पटकूरजीर्ण मगतें देवोनि
आंगावरी॥ लावीलानृपचाकरीस गृहिचा तोकामधंदाकरी॥ येती हस्तकिं
फोडते तर तरांधान्या दळीतां सदां॥ वाहे रक्त तयांतुनी बहुपरी कोणान दावीक
दां॥१४॥ झाडोनीसकळांगणासिंगदळा नेवोनि टाकीहुरी॥ घेवोनीशिरिंघा
गरीजळभरी धांवोनिगंगातिरीं॥ गाधीजेंतवगुप्तरूप घटतो भंगोनियां पाडि
ला॥ तेव्हां आणिक डोंबपत्निजवळी मागोनियां घेतला॥१५॥ ॥गीत॥
यापरिघट भंगितांशिरीं चेदाही॥ महारीणक्षोभूनलत्ता ह्मणित पाहीं॥ मग
मुनिराजणिछिद्रकरिलवलाहीं॥ अवघा दिनजळभरितां नुरलें कांहीं॥ परिसा
भावि०॥१६॥ ॥छंद॥ ॥ डोंबभोजनीउदक मागतां॥ खडबडीततो-
राजणरिता॥ धरुनियांशिखेंडोंबत्यासदां॥ मारमारुनीकरितिआपदा॥१७॥
॥ ॥आर्या॥ ॥ वांधुनिताडितिओढिति, खाटिकजेंसे झडोपडोवकरें
॥ तैसेराया ह्मणिति दंडेंपादें हिउग्र डोंबकरें॥१८॥ ॥छंद॥ ॥ ह्मणत
मांसहेंरांधिरेतरी॥ भाजतीमिशा फुंकितांचुली॥ सूर्यअस्तनोजालियापुढें
पदरिंघेतसें धान्यकोरडें॥१९॥ ॥श्लोक॥ ॥पिष्टाचें मगरोरच्यारबर
वे केले तदां त्यातुनी॥ अर्पायाअतिथीस अर्द्धउरले ते आपणालागुनी॥ विश्वा-
मित्रधरोनिवेषदुसरा मागे तदांभोजना॥ रायेंपूजुनि वाढितां सकळही तोभ-
क्षित्याची क्षणा॥२०॥ ॥आर्या॥ ॥ नित्यनवावेष मुनी, भक्षीघे-
वोनिपानगेचारी॥ बोलेऐसीत्वमी; प्राप्तिनव्हे स्वर्गिंच्या हिउपचारीं॥२१॥
भूपनसान्तउपासी, नित्यनिजेवीरबाहुदारांत॥ उपसीउठेद्वळाया, गणिला
जोबुधजनींउदारांत॥२२॥ ॥दिंडी॥ ॥ ऐसेंवर्षलोटतांजाण त्या
ला॥ हरिश्चंद्रअत्यंतरोडजाला॥ ह्मणतिडोंब लागला रोगयासी॥ व्यर्थ-

गेल्या आयुच्या हेमराशी ॥ २३ ॥ नव्हे काज यालागि स्मशानातें ॥ रक्षणार्थ ठेउ नी बदनित्यानें ॥ विना द्रव्य घेतल्या कदापाहीं ॥ प्रेत जाळों घावें न सर्वथाही ॥ ॥ २४ ॥ ॥ साखी ॥ ॥ इकडे तें व्हाकाळ कौशिका, सदनी राज्ञा असतां ॥ उसंत नो हे अहोरात्र कीं कष्टें धंदा करितां ॥ २५ ॥ शिष्य नयांचे त्यांत असे तो ॥ बाळक रोहीदास ॥ नयां सगती काळक्रमोनी, शिणवित से दे हास ॥ २६ ॥ ब्राह्मण बोले समस्तां सत्या, पुष्पें तुळसी कमळें ॥ दर्भसमीधा घेउनि यावें सत्वर पूजन वेळें ॥ २७ ॥ ॥ छंद ॥ ॥ पानलीं वना सर्व बाळकें ॥ तुळशि दर्भ ही रखु डिति कौतुकें ॥ कमळ दे रवुनी नव सरोवरी ॥ रोहिदास नो शिरन अंतरीं ॥ २८ ॥ पूर्वि कौशिकें तक्षकाप्रती ॥ धाडिला बसे ज्यांत दुर्मती ॥ नें चि पद्म तो बा ळ तो डिलां ॥ व्याळ सत्वरी होय खंडिला ॥ २९ ॥ ॥ ओवी ॥ ॥ हाक फो डोनी रोहिदास ॥ मूर्छित पडिला धरणीस ॥ बाळें आकंदती बहुवस ॥ बा तुझें माते सकाय सांगों ॥ ३० ॥ ॥ पद्य ॥ ॥ नंव तो बोले तुह्मीं गृहासीं ॥ जा तां माता पुसेल मजसीं ॥ माझा प्रणाम सांगुन निजसीं ॥ नकरूं द्या शोका ॥ ३१ ॥ ऐसा बोलत असतां आला ॥ झेंडू त्याचि याव दनाला ॥ वेगासरिसा त्य- जिता जाला ॥ पंचही प्राणासीं ॥ ३२ ॥ बाळें रोदत सदना आलीं ॥ तारामती नें कथितीं जालीं ॥ परिसुन माता शरीर घाली ॥ धरणीवर दुःखें ॥ ३३ ॥ ॥ आर्या ॥ ॥ एकूलतें मम बालक, नेलें तें केवि निष्ठुरें काळें ॥ काळें करून नृपासीं, भेटलिया दाउं काय मुख काळें ॥ ३४ ॥ ॥ गीत ॥ ॥ मगते वृत्तविचारी संगति यातें ॥ कोठें त्यजिलें बारे मम वत्सातें ॥ अनाथ होउ न पडलें कवण वनातें ॥ काय तुह्मासीं वदलें मसि सांगा तें ॥ परिसा भावि० ॥ ३५ ॥ करितां बहुवस धंदा ह्मणे मजलागीं ॥ मातें श्रमलिस बैसें मी निज आं- गीं ॥ रगडीतों पाय तुझें अति अनुरागीं ॥ तो मज सांडुन गेला कैसा वेगीं ॥ परि सा भा० ॥ ३६ ॥ ॥ कडवीं ॥ ॥ केला काय मीं पंक्तीभेद ॥ कीर्तन उच्छेद ॥ किंवा अवमानुन साधू वृंद ॥ लावीला शब्द ॥ ॥ चाल ॥ ॥ अथवा धरुनी व्रतनियमातें ॥ अपूर्ण त्यजिलें त्यातें ॥ एकाभोते० ॥ ३७ ॥ केला द्रव्याचा अभि लाष ॥ कीं हरिपूजन-हास ॥ क्षुधितामुखिंचा काढुन ग्रास ॥ दिधला बहुत्रा-

स॥ ॥चाल॥ ॥ किंवापाडसआणिकुरंगी॥ विघडीलेंम्यात्यांनें॥ ऐकाश्रोते ॥३८॥ ॥ श्लोक॥ ॥जळततदपिऐसीदुःखशोकानळानें॥ तळमळि-त्यजितांचीमीनजैसाजळानें॥ गलबलकरितांतोविप्रयेईलरागा॥ म्हणउनिकरिधंदात्याभयेंश्रेष्ठभागा॥३९॥ ॥आर्या॥ ॥ सारुनसर्वहिधंदा, जालीया मध्यरात्रिउप्रांती॥ कोठेंबाळकपडिला, हुडकायामगनिघेवनप्रांतीं॥४०॥ ॥ ओवी॥ ॥ म्हणेंबारेमजडोळसा॥ कोठेंआहेसराजहंसा॥ सख्याओरेपींवो पाडसा॥ रोहिदासासकुमारा॥४१॥ ॥आर्या॥ ॥ तूंतेंसिन्दूफराळा, केलेंस्नानार्थतोयहीऊन॥ ऊनवनीतुजबाधिल, पाहेंपथमींसचिंतहोऊन॥४२॥ ॥ ओवी॥ ॥ ॥धांवतांआंधारींचहूंकडे॥ क्षणक्षणाअडखळोनीपडे॥ भाळीआदळतीवृक्षरोकडे॥अश्रूद्रुवाहेनकळेतें॥४३॥ ॥दिंडी॥ ॥ सरोवरींबाळकप्रेतहोतें॥ सतीपुढेंराकिलेंगाधिजेतें॥ लागतांचीपांयांसचांच पोनी॥ वोळखीलेंस्तनशवातयेक्षणी॥४४॥ निढळासींनीदळमेळवीलें॥ करी शोकआक्रोशतयेवेळे॥ म्हणेंकांबासोडिलेंविदेशासीं॥ बोलकांहींपाडसामं-जपासीं॥४५॥ स्नेहपान्हाफूटलातदांमूखीं॥ घालिस्तनघेउनीप्रेतअंकीं॥ वि प्रवेषेंगाधीजप्रघरोनी॥ म्हणेकोणरडसितूंययास्थानीं॥४६॥ ॥ साखी ॥ ॥ सतीम्हणेंबासर्पेडंखुन, वधिलेंममपुत्रासीं॥ विप्रवदेतरीआलाचरात्री दहनकरावेंयासीं॥४७॥ डोंबदेखतां नदेतिजाळों ऐसेंबोलुनवेगें॥ गंगातीरीं-आणुनप्रेता॥ केलितयारीआंगें॥४८॥ प्रेतघालुनीसरणीवेगें, आपणजालाशु स॥ तारामतितेरोदनकरितां, ऐकुनयेनृपनाथ॥४९॥ ॥ छंद॥ ॥ केंशिंधरुनियांबोदिलेतीसी॥ धनदिल्याविनाकेविजाळिसी॥ लाथदीधली तीजक्षोभुनी॥ सरणाविझविलेंतोयसिंचुनी॥५०॥ सतिपुढेंतदां प्रेतराकिलें॥ केशजळुनियांअंगभाजलें॥ विभत्सहोउनीपडलेंलेंकरूं॥ सतिम्हणेअहाकर्म दुस्तरु॥५१॥ ॥आर्या॥ ॥ राजाम्हणेआहाहा, कोणेकाहोमहाम हीपतिचा॥ बालककाळकवकहा, नाहींपरिहारमृत्युच्यागतिचा॥५२॥ ॥ श्लोक॥ ॥नृपवरतिजबोलेकोणतूंचारुगात्री॥ रुदनकरिसियेथेंयेकलीमध्यरात्री॥ नकळतकवणाचापुत्रहाजाळितेसी॥ त्वरितमजसिसांगेंसत्यतेंनि-

श्वपेसी॥५३॥ ॥आर्या॥ ॥रावअयोध्यापतिची, भार्यामीरोहिता
श्वसुत त्याचा॥ नक्षकदंशेंमेला· मालविला वंशदीप सवित्याचा॥ ५४॥ ऐकु-
नमहिवरभूपति, मूर्छायेवोनि वृक्षसापडला॥रडलादुःखभरेंबहु, नमरेजो
डोंबहस्तिंसांपडला॥५५॥ ॥श्लोक॥ ॥नारामतीबोलतजाण त्यातें॥
तूंकोणहेंसत्यनिरोपिंमातें॥ सांगेहरिश्चंद्रअसेंतियेसी॥मातेंजनी बोलति
निश्वपेसी॥५६॥ ॥ओवी॥ ॥काळकौशिकेंतुजनेलिंयावरी॥ म्यांवि
कोनघेतलेंडोंबाघरीं॥ मजअन्ननाहींवर्षभरी॥ सांप्रतस्मशानरक्षितसें॥५७॥
॥ ॥आर्या॥ ॥राज्ञीश्वपच्यासमती, पतिचीपाहोनदुर्दशारडली॥
घडलीदुर्गतितुह्मां, ऐसेंबोलोनमूर्छितापडली॥५८॥ ॥ओवी॥ ॥
असो एकमेकांचेगळा पडोन॥ शोककरितीअत्यंत दारुण॥ रायेंपुत्रप्रेता कवळुन॥
मांडिलाविलापआक्रोशें॥५९॥ ॥आर्या॥ ॥चांडाळाज्ञानसतां, हो
मावा पावकांनसुतकाय॥ नरितेयुक्तनदेची; करणेंयातेंउपाय तोकाय॥६०॥
॥ ॥ओवी॥ ॥मगआज्ञाघ्यायाडोंबासदनी॥ नृपजातांमुनीतेथेंये
उनी॥नारामतीसह्मणेंयये स्थानी॥विवशीतूंतेंभक्षील॥६१॥ ॥साखी॥
॥ ॥देवालयतेपैलअसेत्या, माजीक्षणभरबैसें॥ मगतेप्रेताघेउनिआली॥ देउ
ळिंऐकुनिऐसें॥६२॥ दुःखनिजेनेंतिजसीं व्यापितां, विप्रेंफाडुनप्रेत॥ आंतडिका
ढुनतिचेमुखासीं॥ सरक्तलाविलित्वरीत॥६३॥ शंखध्वनि मगकरिल आपण॥ बा-
हेरयेताजाला॥ वेसकरासीं ह्मणेंलांवहो, आलयिंभक्षितबाळा॥६४॥ ॥
ओवी॥ ॥माझेपाठिसहोतीलागली॥ म्यांभेणेंहाकफोडिली॥ तुह्मादेखो
नदेउळांतगेली॥ माराभक्षील सकळांतें॥६५॥ ॥दिंडी॥ ॥प्रातःकाळ
जाहलातदापाही॥ लोकतेथेंपातले लवलाही॥ महारांहींजावोनिदेउळांत॥ ध
रुनकेशींबांधिलेंगळांप्रेत॥ ६६॥उफराटे हस्तनेआकळीले॥ नेत्रदोन्हीतेसेचबां
धियेले॥ ताडितचीआणिलीराजद्वारा॥ अमितशोकानेंकरीभूपदारा॥६७॥
॥ ॥आर्या॥ ॥रडतांरडेलकितितें, जालेंअतिशुष्कजाणनरडेतें॥न
रडेउलटेंक्लेशा॥तुळितांनपुरेधराहिपरडेतें॥६८॥ ॥ओवी॥ ॥डों-
बानेंआज्ञाकरीचौधरी॥ लांवेचाशिरच्छेदकरासत्वरी॥ केशींधरूनतयानिष्ठुरीं

पुरीबाहेर नेलीपैं ॥ ६९॥ वीरबाहू हरिश्चंद्रालागुन॥ ह्मणें इयेचें करीशिरच्छेदन ॥ येरू ह्मणें आज्ञाप्रमाण ॥ वोळखिलें निधान तारामती॥ ७०॥ ॥ छंद ॥ ॥ स्वर्धुनीजळीं स्नान करउनी॥ उभीवधावया केली तत्क्षणी ॥ परि अंतरीं स्मरुनि-माधवा ॥ मागत असे हें चितें धवा ॥ ७१॥ ॥ आर्या ॥ ॥ नाथ हरिश्चंद्रअसो, जन्मोजन्मीं गुरूवसिष्ठमुनी ॥ स्फतरोहिताश्वयाचक, कौशिक मागे असे स-तीनमुनी ॥ ७२॥ राववधाया उचली, करतंव ह्मांह्मां ह्मणोनि ये हरितो॥ नृपकर सशस्त्र आकळि, स्मरणें अघनघ समस्त जो हरितो ॥ ७३॥ ॥ ओवी ॥

॥ नृपातें आलिंगी जगजेठी ॥ येरें चरणी घातली मिठी॥ रोहिदासा उठवि लें अमृतदृष्टी॥ हृदयीं धरिली तारामती ॥ ७४॥ जाला एकची जयजयकार॥ स्फुमनसंभार वर्षती स्फुरवर॥ प्रघट होउनी गाधीकुमर॥ हृदयीं धरिलाभिवगों॥ ७५॥ ॥ कडवी ॥ ॥ कोटीवर्षें विश्वामित्रें ॥ तपकेलें होतें॥ अवघें श्रयतें भूपाळातें ॥ दिधलें नीज हातें॥ ॥ चाल॥ ॥ वीरबाहु आणि काळकौशिका ॥ उद्धरिलें कमलाकांतें ॥ ऐकाश्रोते ०॥ ७६॥ आला सद्गुरु वसिष्ट धाउनि ॥ अ-तीप्रेमें करूनी॥ रायें देखुनत्यातें नयनीं॥ लागे दृढ चरणी॥ ॥ चाल॥ ॥ देवसमस्लिक सर्व येउनी ॥ नमितीनृप सह राज्ञीतें॥ ऐकाश्रोते ०॥ ७७॥ ॥ गीत॥ ॥ मगत्या विश्वामित्रें गजरें करूनी॥ सपरिवार नृपासीं अयोध्या भुवनी॥ आणुनियां स्थापिलें सिंहासनी॥ गुढिया जनउभविती हर्षें सदनी॥ परिसाभाविक ०॥ ७८॥ ॥ साखी॥ ॥ अयुताब्दें वरी राज्य करूनी, राया हरिश्चंद्रानें॥ स्वपुरीसह मग वैकुंठातें, गेला आनंदानें ॥ ७९॥ ऐसें प्रेमळ चरित्र गातां, अगाध दुरितें हरती॥ कृष्णदास करि विनती यास्तव, परिसा जन हो प्रीती ॥ ८०॥ ॥ इतिश्रीकृष्णदास दामोदर कविविरचितं हरिश्चंद्राख्यानं समाप्तं॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥ ॥ श्रीरस्तु॥ ॥ शुभंभवतु

गीत ११ ओंव्या २४ दिंड्या १९ श्लोक २४ आर्या २९ छंद १५ साख्या २५ कडवीं १५ कटाव १ पदें ७ एकूण १८०



अथमार्कंडेयआख्यानप्रारंभः

श्रीगणेशायनमः॥ ॥साखी॥ ॥ मृकंडनामक महातपस्वी, मुनिवरसत्पथगामी॥ प्रियानयाचीलागुनचरणीं, विनवीगुजनिजधामी॥१॥ संतानेविणजिणेजगींमग, भासे व्यर्थपसारा॥ यास्तव स्तउनीगौरीशास्तव, मागा कुलउद्धारा॥२॥ ॥आर्या॥ ॥ पुत्राविणेंनसद्गति, आकर्णुनि भाषणा अशा स्त्रींच्या॥ मानीकृतमुनियास्तव, नवदेहें आश्रयें अशास्त्रींच्या॥३॥ ॥ दिंडी॥ ॥प्रियेचीयाअंतराजाणुनीया॥ वनीगेल्यातोतपानिघोनीयां॥ शीतउष्णासोसुनीतापभारी॥ अनुष्ठानीं बैसलानिराहारी॥४॥ षडाक्षरीविध्युक्त मंत्रकोटी॥ जपहोतांपावला ईशतुष्टी॥ मुनीसन्मुखयेउनीतत्क्षणीं॥ वरंब्रूहीयापरीवदेवाणी॥५॥ ॥आर्या॥ ॥परिसूनमहेशवचना, सुखकारकत्यामृकंडसंतानें, बोलेविरक्तमीपरि, निरसावें दुःखजें असंतानें॥६॥ सांगेप्रभुगुजऐकें, मूर्खकुरूपहि शतायुसुतपाहें॥ अल्पायुसाधुधीमान्, कवणरुचे यांत सांगसूतपाहें॥७॥ ॥ओवी॥ ॥ऐकोनिमुनीजाल्ग्रानरस्थ॥ दोहींकडेवेधलेंचित्त॥ मगम्हणेतेंविनयें विनिहस्त॥ भवधीकिंचित मजयावी॥८॥ कोणतापुत्रकांतलागुनी॥ मानवेमनींविचारुनी॥ ऐसें बोलोनस्वाश्रमींयेउनी॥ स्त्रीतेंसांकल्यकथियेलें॥९॥ ॥ छंद॥ ॥ नंदुनीसतीप्राणनायका॥ वदतमू


र्वतोस्कतनकानका॥ उपलयाजगीं थोरबहुदिसीं॥काकधूकते दीर्घआयुषी॥१०
॥ डागसत्कुळा मूर्खत्यागुणें॥व्यर्थकायसें हीनतेंजिणें॥ ह्मणुनसांगत्येंसत्यआय
का॥ शतायुमूर्खतोस्कतनकानका॥११॥ ॥सारवी॥ ॥साधूस्कंदरस्क-
गुणीज्ञाता, जरितोअल्पवयाचा॥ तरिवंशातें मंगलकारक, वेचासत्यस्करवाचा
॥१२॥सत्कर्मानें आचरितांतो, त्याचीपुण्यप्रभावें॥ गिरिजावल्लभपाउनितुष्टी,
वारिलविप्रस्वभावें॥१३॥ ॥दिंडी॥ ॥ऐकुनीयांयापरीप्रियावाणी॥
त्वरें आलाज्यास्थळीं शूळपाणी॥ ह्मणे देवादेमसींसूतज्ञाता॥ शंभुअस्तूबोलुनी
होयजाता॥१४॥ ॥आर्या॥ ॥स्वाश्रमिमुनिमगयेउन, रमतांवनितेसि
तोस्वभावानें॥ अंतर्वत्नीजाली; सतिईशाचावरप्रभावानें॥१५॥ नवमासपूर्णभर
तां, प्रसवलिशुभलग्निंतेस्कपुत्रास॥ पाहुनितहृदनातें, गमलेयोस्करवउणेंचिवि
प्रांस॥१६॥ मार्कंडेयाख्यअसें, प्रीतीनें ठेविलेंचिजनकानें॥ परिस्कानिमधुबाळव-
चा, हर्षतिमातापितास्कजनकानें॥१७॥ ॥ओवी॥ ॥पंचवर्षेलोरतां
साचार॥ मुनीनेकेला द्विजत्वसंस्कार॥ चतुर्वेदषड्शास्त्रें समग्र॥ विद्याकळाअ-
भ्यासिल्या॥१८॥ ज्याचीधी प्रभाअंतरींझळके॥ श्रवणेंचिसर्वआकळीतर्कें॥
पुराणें इतिहासनाटकें॥वेदांतसिद्धांतसर्वही॥१९॥ ॥आर्या॥ ॥
यापरिस्करवांतजातां, पळपडिदिनरात्रमासकाळजिला॥ ब्रह्मादिशंकतीत्या,
व्राहतीमातापिताहिकाळजिला॥२०॥ ॥सारवी॥ ॥षोडशवर्षेपुत्र-
वयातें, सन्निधआलीभरत॥ जाणुनिरडे दुःखेंनिसिदिनि, रुदनिअपारयुग
॥२१॥ अहाअहारे देवा ह्मणुनी, शोकें बडवितिभाळा॥ अल्पायूस्कतकशासदि
धला, आमुतेंत्रिभुवनपाळा॥२२॥ ॥पद॥ ॥हरहराशिवशंभोके
लासवासी॥ कांरेदुःखडोहींढकलिसिआह्मासी॥ ध्र०॥ अघटितआमुचें
प्राक्तनसूत्र॥ स्वल्पायू ह्मणुनीत्वांदिधलासीपूत्र॥ हरहर०॥१॥ दाउनिस्क
खलेशदुःखअनिवारी॥भोगवीसीकैसें बांत्रिपुरारी॥ हरहराशिवशंभो॥२
॥ ॥सारवी॥ ॥रोदनकारणकळतांतनया, मानिलभयतोभारी॥ या
स्तवअंतरिंनिशिदिनिस्करती, नकळतयापरभारी॥२४॥ ॥दिंडी॥ ॥
नथापीतेंनाकदांदुःखझांके॥ सर्वेंद्रीयाशोकाब्धिबारयफांके॥अश्रुधारालो

चनींबळें येती॥ देखुनीयां शंकीत पुत्रचिची॥ २५॥ ह्मणें काय कारण रोदनासी॥ तदा सांगे सांकल्य माय त्यासीं॥ अरे बाळा षोडश वत्सरांतीं॥ तुला जाणे निश्चयें मृत्युपंथीं॥ २६॥ ह्मणोनीयां काळजी मना वाटे॥ कसें थोर विघ्न हें वरी वाटे॥ ऐसें वाक्य बोलुनी तया कंठीं॥ स्फुंदस्फुंदोनी नदां घालि मीठी॥ २७॥ ॥ पद॥ ॥ कसिरे गत मी करूं॥ वत्सा कसिरे गत मीं करूं॥ ध्रु०॥ अविदुस्तर भवसागर आतां तुजविण केवीं तरूं॥ वत्साक०॥ १॥ त्यजितां वपुतें प्राण सख्यारे॥ निश्चय आह्मीं मरूं॥ वत्साक०॥ २॥ यातव दुर्धर वियोग दुःखा॥ सांग कशानें हरूं॥ वत्सा कसिरे०॥ ३॥ ॥२८॥ ॥ आर्या॥ ॥ आकर्णुनि रखमातें, वंदुनि बोले सुतो कवचनासीं॥ स्मरतां भवपद अकशर, अनुकंपाले वचनकवचनासीं॥ २९॥ मगउभयांनसुनीतो, निपता जाला विचारुनी मूळ॥ नश्वर सर्व हि जाणुनि, आश्रयिले दृढ जगत्सुता मूळ॥ ३०॥ मृत्युंजया विणें हें, कोण जगीं या अशेष भयनाशी॥ ऐसा निश्चय जाणुनि, तत्पर जाला तदीय भजनासीं॥ ३१॥ स्वीकारुनि शिवदीक्षा, पंचाक्षरिमंत्र अंतरीं जपत॥ रुद्राक्ष भस्म धारण, करुनीयां काळवंचनी जपत॥ ३२॥ ॥ ओवी॥ ॥ ऐसा मृकंडात्मज निशावंन॥ शिवभजनीं सदैव निरत॥ यात्रा मिसें अवनी हिंडत॥ कावेरीतरीं पातला॥ ३३॥ त्याच दिनीं यमगंड समजुनी॥ पार्थिव पूजन आदरी मुनी॥ अंतरीं शिवपादपद्म धरुनी॥ पद्मासनीं बैसला॥ ३४॥ ॥ आर्या॥ ॥ जो जीवांचें शासन, कर्ता निवडोनि सत्य न्यायानें॥ तो निज अनुचर धाडी मार्कंडेयास शीघ्र न्यायानें॥ ३५॥ ॥ ओवी॥ ॥ मुनिंद्रा परी यथाकाळीं॥ अंतकें दूत धाडिले तात्काळीं॥ ते अतिविक्राळ भ्यासुर बळी॥ आले क्ष्मातळीं अनिवार॥ ३६॥ पाशखड्ग खेटक पाणी॥ धांवतां वसुंधरा दणाणी॥ वोटा विदारा ऐसी वाणी॥ गर्जती विशाळ भयानक॥ ३७॥ ॥ साखी॥ ॥ पार्थिव हस्तकिं शिवनामीं रत, मुनितें देखुनि भ्याले॥ धीमंत हि बाळ पळोंप हाती, ह्मणतीं युक्ति न चाले॥ ३८॥ भ्याले समजुनि शिवपूजेतें गर्जत नाम हराचें॥ तेणें न चले बळतें कांहीं, लेश हि यमदूतांचें॥ ३९॥ पूजा सरतां आकळूं ह्मणुनी, तिष्ठति सन्निधानीं॥ जाणुनि मुनि हें वर्म भवानें, रतला अधिक चिध्यानीं॥

॥४०॥ ॥ दिंडी ॥ ॥ मुनीदंगदेखुनीशंभुनामीं॥ दूतगेलेपरतोनकाळधामीं॥ ह्मणतिईशपूजनींमग्नविप्र॥ नचलेबळआमुचेंलेशमात्र॥४१॥ नामवाचे ध्यानसेशंकरातें॥ करावेंजी आह्मितेंकायपतेथें॥ कृतांततेंऐकुनीक्रुद्ध झाला॥ करींदंड घेउनीस्वयेंआला॥४२॥ ॥ आर्या॥ ॥तेव्हांमुनिकरिअंतक, घालायास्तवजपोंनिघालाहो॥ महिषारूढगणासह, क्रोधोत्कर्षेंत्वरेंनिघालाहो॥४३॥ शमनस्वयेंमुनीच्या, कंठींपाशाबळें ऋगारीतो॥ झांकुनिनेत्रमिठीतें, कंवटाळुनशंकरासमारीतो॥४४॥ ईशासहीतपडतां, पाशगळांमुनिभवासहाकारी॥ धांवविभोकरुणाकर, दीनाचाह्मणाविसीसहाकारी ॥४५॥ ॥ सारवी॥ ॥दुर्धरअतिशयसंकटपडलें, कायकरूंतरिआतां॥ कृपाघनायासमयींनुबर्गी, तुजविणनाहींत्राता॥४६॥ ॥ पद॥ ॥ शिवशिवसांबसदाशिवसांब॥ हरहरधांवविभो॥ शिवशिवसां०॥ ध्रु०॥ घालुनिदुस्तरकृतांतपाश॥ योदूपाहेनाचिअवकाश॥ करितांउपेक्षात्तूंनाश॥ होइलप्राणासजाणासिहें॥ शिवशिव०॥ १॥ अखिलजगाचातूंपजमान॥ तुजत्यादीनाचा अभिमान॥ तरिवानकरीतांअनमान॥ सोडविंमानयमकरिंची॥ शिवशिवसांब०॥२॥ ॥४७॥ ॥ सारवी॥ ॥ करुणाऐसीपरिसुन अंतरिं, भोळानाथनिवाला॥ लिंगापासुनिपिंगजटाजुटसायुधप्रकटझाला॥४८॥ हास्यकरोनीरोषोत्कर्षें, हाणुनिलत्ताकाळा॥ महिसपाडिनांदूतपळाले, सर्वाहिदाहीदीशांला॥४९॥ मृकंडबाळाकरुणाघनप्रभुत्ते हेंहृदयींधरीत॥ ह्मणेबावत्साकुनांतनिकरें, श्रमलासीगाबहुत॥५०॥ ॥ दिंडी॥ ॥ कृपसन्नहोउनी शंभुभोळा॥ चिरंजीवअक्षयीत्यासकेला ॥तदा ब्रह्मादीदेवबद्धपाणी॥ स्तवोनीयांबोलतीनम्रवाणी॥ ५१॥ त्यांचिवर्षेषोडशनेमकेला॥ ह्मणुनियांतेअंतकेंधेरियेला॥ नसेत्याचाअन्याययांतकांहीं॥ क्षमाकरुनीतरिकृपादृष्टिंपाहीं॥५२॥ ॥ओवी॥ ॥ ऐकतांस्करवाक्यशूळपाणी॥ संतोषोनिवदेनीतिवाणी॥ जेशिवभजनींनिरतप्राणी॥ काळभीतीतयांनसे॥५३॥ षोडशवर्षेंचिमार्कंडासत्य॥ परीजोकाळजायमद्भजनांत॥ तोनहोयउणागणतींत॥ वर्षनिश्चितजाणिजे॥५४

मगउठवोनी अंतकातें॥ गेले सकळ हीस्वस्थळातें॥ कृष्णदासविनवीश्रोतयां तें॥ सर्वेशदासानें रक्षीअसा॥ ५५॥ ॥ इतिश्रीदामोदरकविविरचिता यांप्राकृतटीकायांमार्कंडेयाख्यानं संपूर्णं॥ ॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥

आर्या १५ ओंव्या ११ छंद २ पदें ३ दिंडी १० साख्या १४ एकूण ५५



अथगोमाईचरित्रप्रारंभः

श्रीगणेशायनमः॥ ॥ कडवीं॥ ॥ वैकुंठहुनितोजगजेठी॥ पुंडलिकाभेटी॥ आलाजगतारायामाठीं॥ भिंवरेचेकांठीं॥ ॥चाल॥ ॥तिष्ठतसत्वरकोणीयावें॥ भजुनमातेंस्वहितकरावें॥ १॥ यात्रेपंढरिच्याजनहोजावें॥ विठुसभजावें॥ यात्रे०॥ ध्रु०॥ आषाढीकार्तिकिदोनीवारी॥ येतीजनभारी॥ त्यासीमुक्तीदेहरितोचारी॥ पाहुनअधिकारी॥ ॥चाल॥ ॥भाविकप्रेमळनमितांभावें॥ करितोभवपारस्वभावें॥ यात्रेपंढरिच्या०॥ २॥ एम्मीऐकुनश्रवणींमान॥ एकवराडदेशांत॥ विधवाब्राह्मणी रहावाराहात॥ केरकग्रामांत॥ ॥चाल॥ ॥ धरिलाअंतरिंहेतुविपेनें॥ जाउनविठ्ठल दर्शन घ्यावें॥ यात्रे०॥ ३॥ नाहींतिजकन्याकिंवापुत्र॥ कींजिचळगामित्र॥ नमिळेचि अन्नहिअथवावस्त्रकींफुटकेपात्र॥ चाल॥ ॥भिक्षामागुनअसतां तेथें॥ ह्मणेसार्थककांहिंकरावें॥ यात्रेपंढरि०॥ ४॥ ॥अभंग॥ ॥

उन, ऐसीतेकायपुण्यआचरली ॥ ४॥ ॥ दिंडी ॥ ॥ रुक्मिणीचाऐको-
निप्रश्नजाणा ॥ कथासांगेस्फुरसीकमुनीजाणा ॥ शिवग्रामींनांदतविप्रएका ॥ धुं
डिशर्मातयासनामदेख ॥ ५ ॥ मुखोद्गतज्यामतीवेदचारी ॥ साहिशास्त्रींनिष्णा
तसदाचारी ॥ नयागेहासन्निधुअनामीक ॥ असेधूर्तनामत्यामेसनाक ॥ ६ ॥ ॥
साखी ॥ ॥ प्रातःकाळींउठोनिद्विजतो, पढवीवेदस्फुताला ॥ अनामिकानें
ऐकुनद्वारीं, तोहिप्रवीणजाला ॥ ७ ॥ मगत्यादुष्टेंमनींकल्पिलें, नष्टहिआपुली
यात्री ॥ त्यजुनीब्राह्मणधर्माचरितां होइलस्फुरवधनप्राप्ती ॥ ८ ॥ द्विजवेषामग
अवलंबोनी हिंडतदेशोदेशीं ॥ ब्रह्मपुरींमगयेउनराहे, लोभेंधनउद्देशीं ॥ ९ ॥
आर्या ॥ ॥ दाउनउत्तमविद्या, भुलवीलेंविप्रदांभिकाचरणी ॥ पूजितिदेउ
नित्यातें, धनजनभावेंचिलागुनीचरणीं ॥ १० ॥ ॥ श्लोक ॥ ॥ विद्यावंत
बहुस्फुकर्मठभला ऐसागुणीजाणुनी ॥ ग्रामींचाद्विजएकत्याप्रतिगृहीं नेंआदरें
प्रार्थुनी ॥ सांग आचडिन्यामुलांसिसिकवा शास्त्रेंश्रुतीसत्कळा ॥ जाणाहेंतु
म्हेंचिहागृह असेविद्यार्थिमींआपला ॥ ११ ॥ ॥ आर्या ॥ ॥ स्वल्पचि
काळेंवेदीं, बाळांनेंनिपुणहोयतोकरिता ॥ मागेनिरोपजाया, घावीमजदक्षिणा
म्हणोत्वरिता ॥ १२ ॥ ॥ छंद ॥ ॥ ऐकतांगृहस्वामियारिती ॥ कांहो
जालसां म्हणत त्यांप्रती ॥ अंत्यज म्हणेंमाउलीपिता ॥ बापाहर्नीजाण तत्वता ॥
॥ १३ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ होणेंअसेलम्नअजूनमाझें ॥ वाटे म्हणोनीशि
रिंफारओझें ॥ ऐकोनियांखिन्नगृहस्थजाला ॥ बोलेनदातोमगकायत्याला ॥ १४
॥ माझीउत्तमकन्यकाबहुगुणी नामेंअसेलक्षुमी ॥ जेकांसुंदररूपकोमलतनू
भासेदुजीलक्षुमी ॥ नेतुम्हांनिजआदरेंचिदधली जाऊंनकासर्वथा ॥ पाहोनी
सुमुहूर्तअर्पिदुहिता त्याअंत्यजातें तदा ॥ १५ ॥ ॥ साखी ॥ ॥ मगतो
दुर्जनपांचवरूषेंश्वशुरासदनींराहे ॥ पुनरपिआज्ञामागत जायानिजदेशालवला
हें ॥ १६ ॥ मायपित्यांदिकवाटपहाती, भेटुनयेतोंत्यांसीं ॥ श्वशूरनेंह्मांबोलनत्या
तें, संगेंन्यावेंस्त्रियेसीं ॥ १७ ॥ ऐकुनआज्ञानिघताझाला, घेउनसंगेंकांता ॥ पंथिं
चालतामनांतत्यासीं, लागुनगेलीचिंता ॥ १८ ॥ ॥ ओवी ॥ ॥ माता
पिंताअमंगळनिश्चिती ॥ झोपडीभोंवत्यापशूच्याअस्थी ॥ देखतांविप्रात्मने

नेचित्तीं॥ककेलयातीपैंमास्ती॥१९॥ हेबाहेरफुटतांगोष्ट॥जनींअन्यायहोईल
भकर॥मजसींशिक्षाकरतीलस्पष्ट॥यानेविचारकेसाकरूं॥२०॥ ॥श्लोक
॥ ॥विश्वासदाउनतरीसतिन्त्यामनाला॥पाषाणघालुनिशिरींहरुंजीवनाला
॥तोंलागलीतिजतृषाअनिवारजाणा॥कूपातदींत्वरितजायवितोयपाना॥२१
सेवीजोंउदकासिअंजुळिभरीतोंत्याकृतभेंझणी॥लोटोनीतिजतोजळींप्लवत-
सेनेथोनित्याचक्षणीं॥तेव्हांशोकजळांतफारअबलादीर्घस्वरेंघीकरी॥देवेंरक्ष
मुळीकरींगवसलीजाणातदासत्वरी॥२२॥ ॥छंद॥ ॥आठऊनियां.
पतिपदांप्रती॥रोदनाकरीफारतेसती॥कायसौख्यकीमजपासुनी॥नेणुजाह.
लीस्वामिसेवनी॥२३॥ ॥पद॥ ॥करिविलापाद्विजदुहिता॥रडतांदीर्घ
स्वरें॥करि०॥धृ०॥दुःखेंकरीतहायहाय॥रोदतमोकलोनीधाय॥सेवेंअंतरपड
लेंकायहेंपतिरायमजसांगा॥करिवि०॥१॥मुकल्येंमाहेरानिभ्रांत॥कैसावोढव
लाप्राणांत॥नयेधाउनकांहोकांत॥करिआकांतह्मणवोनी॥करिवि०॥२॥अ
गाकृपानाकमळापती॥संकटिंअनाथतुजजपती॥टाकुनगेलेमजलापती॥करु
णातुजप्रतीयेऊंदे॥करिविला०॥३॥ ॥२४॥ ॥आर्या॥ ॥परि
सुनिकरुणाशब्दा,आलीबहुकींवतेहरीसतिची॥द्विजवेषेंप्रगटुनियां।अविलं
बेंआधितेहरीसतिची॥२५॥ ॥साखी॥ ॥माहेरींत्यादाउनिपंथा
श्रीहरिजालेगुप्त॥लक्षुमितेथुनजनकासदनीं,येतीजालित्वरीत॥२६॥प्रकट-
नकरितांपतिअन्याया,सांगतचतुराईनें॥पतिनेमजलाकथिजेलींतीं,ऐकेंताता
वचनें॥२७॥दुर्गमपंथाक्रमितांपांयीं पावसिबहुदुःखाला॥यास्तव मार्गेफिरोन
जावें,प्रस्तुतजनकगृहाला॥२८॥स्वल्पचिकाळेंसुखयानीतुज,बसउननेइनदे
सीं॥युक्तभाषणेसंपादणिते,करितीजालीऐसी॥२९॥ ॥दिंडी॥ ॥
हिकडेतेव्हांअंत्यजूनिजदेशा॥पावलातोंजाहलीथोरदशा॥अनावृष्टी होउनी-
तयादेशीं॥मरतिलोकतडनडांउपवासी॥३०॥द्रव्यगांठींअसोनिधान्यकोठें॥
मिळेनाचीदुर्भिक्षपडलेंमोठें॥मायबापसोयरेआमइष्ट॥सर्वकूळतयांचेंजालेंन-
ष्ट॥३१॥ ॥श्लोक॥ ॥त्यातेंहीनमिळेचअन्नकिमपीजालाबहूहिंपुटी
॥तेव्हांएकमनांतयुक्तिबरवीयोजीतपासंकटीं॥कातेंचापधिंजीवजाणहरिलाग

ऊक कोणानसे ॥ दुष्काळेंतरि मृत्युपावलिक थूंता तानि येच्याअसें ॥ ३२ ॥ ॥ ओवी ॥ ॥ यापरी करुन संपादणी ॥ राहावें स्वरूपतयेस्थानीं ॥ पुनरपी द्रव्यसंपादुनी ॥ विवाह दुजाकरावा ॥ ३३ ॥ ॥ आर्या ॥ ॥ ऐसाविचा रयोजुन, मगतो अंत्यजतयास्थळींआला ॥ अवलोकितांप्रियंतें, दचकुनियां अंत रींबहु भ्याला ॥ ३४ ॥ ॥ छंद ॥ ॥ नम्र होउनी लक्ष्मीतदा ॥ लागेयेउनी पतिचियापदा ॥ पंथिचीरवुणा प्रघटनाकरी ॥ सत्वसीलते सत्यसुंदरी ॥ ३५ ॥ श्लोक ॥ ॥ स्वश्रूसासनेंदोंनमस्कारकेला ॥ मनातीलजो धाकतोसर्वगेला ॥ तयानंतरें द्वादशाब्देंचितेथें ॥ वसोनी सुखें भोगिविप्रात्मजेतें ॥ ३६ ॥ ॥ साखी ॥ ॥ उदरिंतियेच्यापुत्रजन्मला, सुंदर लावण्य गुणी ॥ वीर्यऐसा विपरितक्रीडे, वोंगळ त्याची करणी ॥ ३७ ॥ यामाबाहेर जाउनपशुच्या, गोळाक रुनी अस्थी ॥ खेळखेळतां पाहुन लक्ष्मी, जाली शंकितचित्तीं ॥ ३८ ॥ पतिसीबो लेअवगुणी हें, बाळक कांहो ऐसें ॥ याचें लक्षण शास्त्रीं पाहुन ॥ सांगा मजला के सें ॥ ३९ ॥ ॥ दिंडी ॥ ॥ कामिनीचीऐकोनि प्रश्नवाणी ॥ मनामाजी तोह्मणेपापरवाणी ॥ पूर्विंह्याजो अन्यायकेलापाहीं ॥ इणें कोणा तो कळोंदिला नाहीं ॥ ॥ ४० ॥ तरीऐशासाध्वितें निजयाती ॥ सत्यपणें सांगतां नसेभीती ॥ मनीं ऐशाआ णोनिविचारानें ॥ गुजगोष्टएकांतिकथीतीतें ॥ ४१ ॥ ॥ श्लोक ॥ ॥ अनामीकहे माझिगे यातसाची ॥ ह्मणोनीपहा पुत्रखेळे तसाची ॥ असें ऐकतां शंकलीविप्रबाळी ॥ ह्मणे हे हरी काय माझ्याकपाळीं ॥ ॥ पद ॥ ॥ दुस्तरही दैवगती ॥ आहारे दुस्तरही दैवगती ॥ ध्रु० ॥ उत्तमवंशींजन्मपाउनी ॥ अंत्यजप्राप्तपती ॥ आहारेदु० ॥ १ ॥ कायकरूंमी कांहिसुचेना ॥ कुंटितही जाली मती ॥ आहारेदुस्त० ॥ २ ॥ व्यर्थचिजालाजन्म ह्मणोनी दुःखितफारसती ॥ आ हारेदुस्तर० ॥ ३ ॥ ॥ ४२ ॥ ॥ ओवी ॥ ॥ क्रोधें धुंधुःकारिनसर्पिणी ॥ तैसीक्षोभलीद्विजनंदिनी ॥ पित्याजवळीशीघ्रयेउनी ॥ पुसतीजालीशास्त्रार्थ ॥ ४४ ॥ ह्मणे धातुपात्रविटाळल्यानिश्चिती ॥ तें शुद्ध होय कवणेरिती ॥ जनक वदे तियेप्रती ॥ अग्नीदेतां शुचित्वपे ॥ ४५ ॥ ॥ छंद ॥ ॥ ऐकतां असें कोप लीसती ॥ शापिलातरें आपुलापती ॥ महिषपुत्र तूं होउनी खळा ॥ पृष्टिवाहसी

भारआगळा॥४६॥ ॥आर्या॥ ॥माझ्यासन्मुखभागीं, छेदीतिलली
कतत्वदीयशिरा॥तेव्हांतवरत्काचा, लेइनटिकलानलावितांउशिरा॥४७॥ ॥
साखी॥ ॥ऐसादेउनशापसतीने, धरोनिधैर्याचीत्तीं॥घेउनबालकसदनीं
निजली, भावीहरिपदचीत्तीं॥४८॥गृहासिवेगेंलाउनवन्हीं, भाकितकरुणावा-
णी॥तुजविणत्राताजगदोद्धारा, नाहींमजलाकोणी॥४९॥ ॥पद॥ ॥
करुणाभाकिनांतूजवाळी॥धांवेंझडकरिवनमाळी॥ध्रु०॥नष्टेंभ्रष्टकरुनि-
मजला॥भ्रष्टविलेंतूजयातीला॥जडलेंलांछनवंशाला॥मुकल्येंसर्वहिस्वा
र्थाला॥विधिनेलिहिलेंहेंभाळीं॥धांवेंझडकरिव०॥१॥पतिनेंमजलाउदकांत॥
लोटिलेंयोजुनियांघात॥कपटदुष्टाचेचित्तांत॥नकळेमजलाहीमात॥साहिले
दुःखनयेकाळीं॥धांवेंझडकरिवन०॥२॥आतांनिजपदिंमजथारा॥देउनता
रींदातारा॥ऐकुनसतिच्याहाहाःकारा॥आलीकीवजगदोद्धारा॥पावलादिनबं
धुतात्काळीं॥धांवेंझडकरिवनमाळी॥३॥ ॥५०॥ ॥साखी॥ ॥
मागम्हणेंवरप्रसन्नजालों, बोलेलक्षुमितेव्हां॥तुमच्यावदनीमाझेंसुखहें, प्रीति
असावें देवा॥५१॥पुत्रासीयाहस्तांकिंधरणें, तथास्तुबोलेहरी॥यापरिवांछि
तदेउनिनीतें, गेलादिनकैवारी॥५२॥ ॥दिंडी॥ ॥मुक्तकेलींदोघां
सिंजगन्नाथें॥कलेवरेंदग्धलींपरीतेथें॥नयावरीलोटतांकाळकांहीं॥घोरारण्य
वाढलेंतयाठायीं॥५३॥सतीदेहापासूनीवंशजाणा॥उद्भवलाअद्भुततया-
स्थाना॥सन्निधानींत्यांचियापुत्रतोही॥उगवला होउनीवेत्रपाहीं॥५४॥ ॥
ओवी॥ ॥त्यावरीलोटतांकित्येकदिवस॥गोकुळींअवतरलाश्रीनिवास॥
उद्धरावयानिजजनास॥गोधनेंचारीतकांतारीं॥५५॥वंशवेत्रउद्भवलेज्यास्थळीं
॥तेथेंक्रीडतयेउनीवनमाळी॥वेत्रस्वीकारिलाकरकमळीं॥आणिकमुरलीके-
लीवंशाची॥५६॥ ॥दिंडी॥ ॥निजवदनेंवेणुतेंमुखाप्रती॥लाउ
नीयांवाजवीरमापती॥धरोनीयांवेत्रतोकरींपाहीं॥तेणेंवाळिल्याकाननींसर्वगा
ई॥५७॥ ॥श्लोक॥ ॥सांगेनारदभीमकीसबरवीं अत्यादरेंहीक
था॥जालीयारितिकृष्णजीसमुरलीतेसप्रियातत्वतां॥व्यासेंस्कंदपुराणिजा
पाकथिलें ऐशाचरित्राप्रती॥मज्जेंआवडिकृष्णदासविनवीश्रोत्यांसिप्रीती-

अती ॥५८॥ ॥ इतिश्रीदामोदरकविविरचिते मुरलीचरित्रं समाप्तं॥
श्री कृष्णार्पणमस्तु ॥ ॥श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु॥ ॥श्रीरस्तु॥
आर्या ६ श्लोक ११ साख्या १७ दिंड्या ९ छंद ४ ओंव्या ८ पदें ३ एकंदर ५८



अथ ध्रुवाख्यान प्रारंभः

चाल दिंडी.

श्रीगणेशायनमः॥ सूर्यवंशीउत्तानपादराया ॥ रूपवतीतयासि दोनजाया ॥ कनिष्ठेसी अत्यंत प्रीतमाया॥ पट्टराणी नावडे तया राया ॥ १॥

वरिष्ठेसी जाह्लाएकपुत्र॥ भक्तराजवैकुंठपाळमित्र ॥ सकूमार आकर्ण पद्म नेत्र ॥ गणमाणगखिलेजे विचित्र॥२॥

पांचवर्षे लोटलीं ध्रुवा अ गीं॥ पिताठाऊक नाहिं तयालागीं॥ ह्मणे मातेसी भक्तराजयोगी ॥ तात कोठें तो सांग मज वेगीं ॥३॥

ह्मणे माय तान्हया तो चित्त् झा ॥ धराधीशबोलती जासि राजा ॥ येरूबोले पाहीन पितामाझा ॥ नको जाऊं मारील राजभाजा॥ ४॥

पूर्वपुण्यं सद्दीन उगवला ॥ मुलां संगें तो राजगृहा गेला॥ राजदृष्टीसन्मुख उभा ठेला ॥ पिता पाहे तों मोह झळंबला ॥५॥

अनीवार मोहासि पूर आला ॥उचलोनी मांडिये बैसवीला॥ बाळशब्दें खेळवी

तनूजाला॥ नसाहेचराणियेकोपआला॥ ६॥
उचंबळे क्रोधाग्निशिखायाकी॥ ह्मणेकोण बसलाराजअंकी॥ रावकेसारखेळवी कवतूकी॥ ध्रुवराज हाईलनिश्चयेंकी॥ ७॥
धरूनियांसापत्नभावचित्ती॥ पदींलोटूनीपाडियेलाक्षीती॥ रडतगेला माउलीजेथें होती॥ नरवंडचतेनेत्रअश्रुपाती॥ ८॥
ह्मणे मायतान्हयाकाय झालें॥ कोणे पापियेंतुजगांजियेलें॥ मजरायें मांडिये बैसवीलें॥ राजआज्ञेनें पदींलोटियेलें॥ ९॥
बुझावी नामाउलीकाय बोले॥ नाहिंपूर्वी देवाभिआराधीलें॥ स्वामिजैसेंमांडियेबैसवीलें॥ रमारंगश्रीपिताकायचालें॥ १०॥
ध्रुवबोलेतोदेवकैसाआहे॥ वसे कोठें तो सांगवल्लाहें॥ तया मागोंअविनाश एकठाय॥ परमागोंनूढवीदुजीमाय॥ ११॥
अरेबाळावल्कलनराधर्म॥ भस्म अंगींनावितीदिगांबरी॥ सर्वभोगीउदास ब्रह्मचारी॥ निर्जनीधुंडितीगिराहारी॥ १२॥
अधोमुखपंचाग्निधूम्रपानी॥ ऊर्ध्वबाहु आकाशपदामोनी॥ सीतउष्णपर्जन्य तापतीन्ही॥ जयलागीसोसितीमहामूनी॥ १३॥
तुझीबुद्धीकायबावयसान॥ तुजकाय होईल दरशन॥ ध्रुवबोलेत्यजीनऔपुलाप्राण॥ नभेटनोदेणारदरशन॥ १४॥
उभाहोतानेगांचिजायवेगें॥ रडतपाठीलागली मायमागें॥ पुत्रगेला रायासिं दूतसांगे॥ राव झाला घाबरा मोह संगे॥ १५॥
सर्वभोरव्याचेंमूळदाळ माझें॥ ध्रुवगेलाघेणारराज्य ओझें॥ त्यजिलप्राण वनांत लोकलाजे॥ नेणोंकाय मांडिलें दुष्टभाजे॥ १६॥
लवलाहें धांवला ध्रुवापाठी॥ ह्मणेबाळा आईकएकगोष्टी॥ बुझावीतोधरूनह नूवटी॥ तुजवीण टाटलाप्राणकंठी॥ १७॥
ध्रुवबाळचालिलाल्हर्षीकेशी॥ बाळाकूळभूषण आह्मा होसी॥ नाहि दूजे आमुच्यावंशासी॥ तुजवीण होउंगापरदेशी॥ १८॥
नकोजाऊं देईनएकगांव॥ ध्रुवबोले देईलदेवराव॥ पांचगांव दीधलेफीरमा·

गें॥ ध्रुवबोले देईलरमारंग॥१९॥
नको जाऊं देईन एक देश॥ ध्रुव बोले देईल जगदीश॥ फीर मागें देईन एकप्रा
त॥ ध्रुव बोले देईल रमाकांत॥२०॥
अर्धराज्य दीधलें फीर आतां॥ ध्रुव बोले मागेन जगन्नाथा॥ सर्व राज्य दी
धलें आण तूझी॥ ध्रुव बोले देवासि लाज माझी॥२१॥
सहज बोलाचा राग धरीयेला॥ सहज हास्याचा निकुर कसा केला॥ ध्रुव योगाची
वारत मज रवंती॥ नमस्कारें अपराध क्षमा होती॥२२॥
प्रेममर्यादेचि बासि मानेणें॥ बाळशब्द अशब्द काय जाणें॥ ह्मणे उद्धव चिद्घन
दयावंता॥ शांत दांत आनंद कृपावंत॥२३॥
ध्रुवाकेसा सांडिला मोह आजी॥ तोंडकाळें जाहलें जगामाजी॥ ध्रुव बोले तया
सिं तात देवा॥ आतां येतों मीं लोभ असों द्यावा॥२४॥
हरीभक्तीचा डोल कसा आहे॥ अनूतापें कोपल्या दिशा दाही॥ ह्मणे धांवें पावें
गा मायबापा॥ कृपावंता अनंता शामरूपा॥२५॥
निरंजनीं येउनी उभा राहे॥ नामघोष मूरवानें गर्जताहे॥ दुरूनी यां अद्रष्टा
सूत पाहे॥ नया लागीं कैवल्य दिसताहे॥२६॥
जवळ येऊनी पुसे बाळकासीं॥ वयसान तूं कोण वनवासी॥ पूर्व वृत्तांत सांग
तां नारदासीं॥ कृपा तोषें तोषला देवऋषी॥२७॥
गुरूमंत्रावांचुनी देव कैंचा॥ श्रमें बोले सर्व ही वेदवाचा॥ अभय हस्त देउनी शि
रीं साचा॥ मंत्र सांगे द्वादश अक्षराचा॥२८॥
ध्रुवाकानीं सांगुनी मुनी गेला॥ जपतांची हृदयीं प्रकाशला॥ लोकलीला वैकुं
ठपाळ आला॥ तयासन्मुख उभा ठेला॥२९॥
सर्व तेजाची एक मूस जाली॥ दिव्य कांतीची दीप्ति प्रकाशली॥ चतुर्भुज सायु
ज्य घननीळी॥ दिव्य मूर्ती त्या ध्रुव देखियेली॥३०॥
नमस्कारें पूजिला हृषीकेशी॥ ह्मणे देव तूं माग इच्छितासी॥ मनोवेगाचा वा
स तुझे पांई॥ गर्भवासें कष्टलों वदों काई॥३१॥
धराधीश कीं स्वर्गभोगवासी॥ करूं इंद्र कीं सांग आपणासी॥ तुझे भक्तीचा

डोलकसादेई ॥ पदवीजे नूठवी दुजीआई ॥ ३२ ॥

॥ श्लोक ॥

वैकुंठाहूनि तोगरूड हरिनें तात्काळ पाचारिला ॥ जेथेंउग्रतपें धरूनि महिला त्यापर्वतींपातला ॥ शक्रादुर्लभ थोरउंचपदजें तेथें ध्रु वस्थापिला ॥ मेरूचे शिखरीं अनंतकविनें लक्षोनियां वंदिला ॥ ३३ ॥


दिंड्या.

दिव्यवीमानींवाहोनि ध्रुव नेला ॥ अढळपदींनेउनी बैसवीला ॥ ध्रुवाख्यान ऐक तीगातिवाचे ॥ ध्रुवलोकीं अक्षयवासत्यांचे ॥ ३४ ॥

ब्रह्मानंद आनंदथोरजाला ॥ अढळपदीं तोध्रुवबैसवीला ॥ बाळभक्तीचीबहू धन्यजाली ॥ शिरीं कमळेंस्करवरें वृष्टिकेली ॥ ३५ ॥

चंद्रसूर्यादीकग्रहणतारा ॥ मुनीसर्व घालितीत्यासिफेरा ॥ उदार्यादासीराव्धिस दनाचे ॥ उद्धवचिद्घनगूणगायत्याचे ॥ ३६ ॥

इतिध्रुवाख्यान समाप्त:



अथ वर्षप्रतीपदाकथा प्रारंभ:

श्रीगणेशायनम: ॥ श्रीसरस्वत्येनम: ॥ श्रीगुरुभ्योनम: ॥ श्रीदत्तात्रयायनम:

ग्रंथारंभींशिवस्मृत ॥ माझीमतीस्तवनकरित ॥ परमसंकटीं गांजिलेभक्त ॥ विघ्नेंछेदितत्यांचीं ॥ १ ॥ तोगजाननाचाशंडादंड ॥ निर्विघ्नकारक प्रचंड ॥ सदस

त्कर्माअखंड॥ विद्वज्जनस्मरतीआधि॥२॥ ऐसाजोकांचराचर॥ त्यासिमाझा नमस्कार॥ जोकांनिर्गुणनिराकार॥ जोपरात्परसर्वाद्य॥३॥ आतांब्रह्मकुमरी-सरस्वती॥ जिच्याचरणींजडलीमती॥ मुकेतेहीवाचाळहोती॥ ऐसीकीर्तीत्रिभुवनीं॥४॥ जवीं टाकितांतैलबिंदु॥ पसरोनि होयजेसासिंधु॥ तेसामतिमंदवोरबुद्दु॥ जीच्याप्रसादेंहोतसे॥५॥ तियेलागींसाष्टांगनमन॥ सद्गुरूचरणींपरमलीन॥ सज्जनश्रोतेभाविकजन॥ तयांतेंनमिलेंमनोभावें॥६॥ ॐनमोजीदत्तदेवा॥ देईमजलाचरणसेवा॥ माझामनोरथपुरवावा॥ माथांठेवावावरदहस्त॥७॥ जोकांव्रतराजग्रंथकर्ता॥ महापुण्यशीळधर्मरक्षिता॥ येणेंनिजनाची-ममता॥ दाविलेंपथासोज्वळ॥८॥ तयामाझेंअसोनमन॥ सकळकवीविद्वज्जन॥ आदिशक्तिचेंकरूनिध्यान॥ कथापावनरसाळजी॥९॥ तीप्राकृतभाषेंकरुन॥ करीतोंव्रतराजाचें कथन॥ पहातांपावतीसमाधान॥ विद्वज्जनअभ्यंतरीं॥ १०॥ वर्ततीपाहोनीजयापरी॥ धरोनिनिष्ठाप्रेमअंतरीं॥ त्यांचींदुरितेंपळतीदुरी॥ ऐशापरीकथितोंहे॥११॥ हेंव्रतराजसारप्राकृत॥ पयमथोनीकाढिलेंघृत॥ जयापुढेंतुच्छअमृत॥ जेंयथार्थअनिश्चवदतसे॥१२॥ जेकांपाहतीप्री-तिकरून॥ चालींचालतीऐकुनीविधान॥ तयादुरनाहींनारायण॥ सत्यजाण-भाषमाझी॥१३॥ असोआतांपूर्वसंधान॥ पुढेंद्यावेंअवधान॥ भगवानसांगेजीखुण॥ तेंनिरूपणऐकावें॥१४॥ मासामाजीउत्तममास॥ चैत्रशुक्लप्रथमदिवस॥ सूर्योदयव्यापिनीप्रतीपदेस॥ करींसायासऐशापरी॥१५॥ जोकांजगन्निवासनारायण॥ प्रकटतयाच्यानाभिपासुन॥ ज्यासह्मणतीचतुरानन॥ विस्मितमनतयाचें॥१६॥ पुनरपीगेलास्वस्थाना॥ लागलाप्रभूच्याचिंतना॥ आटविलाकांप्रेमपान्हा॥ अशास्तवनाआरंभिलें॥१७॥ ह्मणेंमजलाकायकारण॥ उत्पन्नकेलेंजीआपण॥ मींआहेंकोणीलकोण॥ हेंसप्रमाणसांगावें॥१८॥ ऐकतांक्षीरसागरहिवासी॥ स्वरूपज्ञानदाविलेंतयासीं॥ ह्मणेंआतांजाऊनअहर्निशी॥ करींउत्पत्तीसीब्रह्मदेवा॥१९॥ यापरीआज्ञाहोतांत्वरित॥ मगरजोगुणींविभूतिरचित॥ प्रातःकालींचकेलीमात॥ अकस्मातऐशापरी॥२०॥ हाशुद्धपाडव्याचादीन॥ उत्पत्तीसआदीकारण॥ प्रजापतीनेंसंपूर्ण॥ जगनिर्माण

केलेंपैं ॥२१॥ वर्तलें आणि तयादिनी ॥ बळीस राजपदीं बसउनी ॥ त्रिलोकींचा भूप करोनी ॥ पावला समाधानी तेच दिवशीं ॥२२॥ आणि तयाक्रदिनाचे ठायीं कैसें वर्तलें कथितों पांहीं ॥ रवीचें जनन सोम तोही ॥ ब्रहस्पती तोही निर्मिला ॥२३॥ शनी महादुःखरूपि जाण ॥ येक येका राशितें दारुण ॥ छळातें देतां कृपाघन ॥ तोही आपण उद्भविला ॥२४॥ राहु केतु आणि मंगळ ॥ बुधाचें स्वरूप कोमळ ॥ ऐसे नवग्रह सकळ ॥ केले प्रवलोत्पन्न ब्रह्मदेवें ॥ २५॥ राशी अंतरें ग्रहपीडा होतां ॥ जप करवावा सर्वथा ॥ ब्राह्मण द्वारें ग्रहयज्ञ करितां ॥ दान देतां पीडा हरण होय ॥२६॥ साठ संवत्सर तेच क्षणीं ॥ निर्माण केले नामे ठेउनि ॥ अन्य ग्रंथीं सांगितल्यावरुनी ॥ आणा ध्यानीं सकळिक ॥२७॥ तया संवत्सराचे दिन ॥ त्रिशतविंश निश्चय जाण ॥ अहोरात्र घटिका प्रमाण ॥ साठ परिपूर्ण असती जया ॥२८॥ आतां सांगतों ऋतूंची गवें ॥ वसंत ग्रीष्मीं चित्त द्यावें ॥ वर्षा तो शरद हेमंत भावें ॥ शशिरतोंपा हेंसा हवा ॥२९॥ येका संवत्सरा द्वादश मास ॥ तया मासाचे त्रिंशति दिवस ॥ तया मासाचे पक्ष परीस ॥ दोन जयास ह्मणती हे ॥३०॥ आणि संवत्सरांचे स्वामी स्वभावें ॥ उत्पन्न केले ब्रह्मदेवें ॥ सभास्थान जें त्या... [illegible] रचिलें देवें अपूर्वतें ॥३१॥ तया सभेचें वर्णन करितां ॥ शेष ही थकला सर्वथा ॥ जयापुढें इंद्र भुवनाची वार्ता ॥ वर्णितां सर्वथा तुच्छ होय ॥३२॥ तया सभे माझारीं जाण ॥ देव सकळ येती परिपूर्ण ॥ बैसोनि पहाती सभास्थान ॥ आनंदे मन तये वेळीं ॥ ब्रह्मदेव आसनी करिती ध्यान ॥ स्वरुपिं पावती समाधान ॥ तो सकळ देव विनित होउन ॥ करिती स्तवन तयाचें ॥३४॥ हे कमलोद्भवा चतुरानना ॥ कहास्य वदना पद्मलोचना ॥ सकळ जगाचे उत्पत्तिस्थाना ॥ करिती नमन तयासी ॥३५॥ तूं येक आह्मां सकळां आधार ॥ निर्मिले ऐका चराचर ॥ स्थावर जंगम अपार ॥ तया सोज्वळ आधार तुझा ॥३६॥ तुजवीण आह्मां नसे ठावा ॥ दुजा तारक दुर्धर भवा ॥ तूंची आमुचा प्राणविसावा ॥ तारक जीवा सकळिकां ॥३७॥ ऐसें करितां बहुत स्तवन ॥ तेव्हा घडोनि प्रार्हेशा मनंदन ॥ प्रसन्न झाला आनंदघन ॥ बोले वचन अभीष्टतें ॥३८॥ सर्वांसि धर्मोपदेश केला ॥ मार्ग सोज्वळ दाविला ॥ ही तो ईश्वराची च लीला ॥ धर्मा न दळे कोणीही ॥३९॥ सकळ देवांसी स्थानें नेमित ॥ राहोनि येथें रक्षा समस्त ॥ दुष्टां दंड करावा

निश्चिंत॥ भक्तांमरक्षीनअसावें॥ ४०॥ तयापासुनीधर्मस्थिती॥ जगसंबंधिलो
कचालती॥ धर्मीवरीठेवोनिअतिप्रीती॥ नांदतीसीतीसमग्र॥ ४१॥ आतांवर्षप्र
तिपदेच्यादिवशीं॥ आज्ञाहोकांचतुर्वर्णाशीं॥ प्रातःकाळींउठोनिलवलेसी॥ मांग·
लिकस्नानकरावें॥ ४२॥ स्नानजालियावरीजाण॥ करूनियांएकाग्रमन॥ चित्तीं
करावेंअखंडचिंतन॥ आठवींनारायणसद्भावें॥ ४३॥ द्वारामाजीआनंददेणारीं॥
चिन्हेंकरावींऐशापरी॥ ध्वजउभारूनीस्तडकरी॥ बांधेपरोपरीएकाचीं॥ ४४॥
जींकांमंगलदायकअसती॥ तींआणावींधरोनिप्रीती॥ जयामाजीमंगलगीत
गाती॥ तयांसावचित्तींपरिसावें॥ ४५॥ ज्याज्यावर्णाचाजोजोधर्म॥ त्याणेंनित्य·
नैमित्तिककरावेंकर्म॥ जाणोनिआपुलेंकल्याणवर्म॥ परकीयधर्मनाचरावा॥ ४६
॥परधर्महोतमहद्भय॥ बुद्धीभ्रष्टहोवोनिजाय॥ ऐसाकासयाकारणेंउपाय॥ अं
तरींपायदेवाचे॥ ४७॥ स्वधर्मानुष्ठानेंजोनिष्णात॥ तयाकारणेंनलगेपुनीत॥
होतीपूर्णमनोरथ॥ उत्तमसेव्यंतजननतया॥ ४८॥ आपुलेंस्वकर्मजाल्यावरी॥
मगघेऊनितेअवसरीं॥ मृत्यलोकींअमृतापरी॥ वृक्षनिंबाचेंपारिभद्र॥ ४९
तयाचेंपत्रपुष्पसहित॥ चूर्णकरोनीमेळवींजयांत॥ मरीचीहिंगुलवणसमस्त
॥जिरकजयांतअसावें॥ ५०॥ अजमोदावोंवातयामाजी॥ येकत्रचूर्णीमेळवा
जी॥ एवंभक्षितांकरवसहजीं॥ जीवराजीहोयसदा॥ ५१॥ तयाभक्षणेंकरू·
नीजाण॥ विपुलआयुष्यविद्याधन॥ लक्ष्मीचीवृद्धीहोवोन॥ सुखावेंमनपरो
परी॥ ५२॥ नानाविधरोगांनींपीडा॥ नासूनिजायजयापुढां॥ ऐसाजयाचापवा
डा॥ वदलीभउभडांग्रंथबहू॥ ५३॥ ऐसाहाभक्षणविधिकरूनि॥ मगलागावें
गणेशचरणीं॥ पंचांगस्थजोलिहिलालेखनी॥ तयापूजनीलागावें॥ ५४॥ क
रूनितयाचेंपूजन॥ धूपदीपनैवेद्यसमर्पून॥ तांबूलदक्षिणादेऊन॥ करावेंनम
नतयासीं॥ ५५॥ सुप्रसन्नवदनबैसावें॥ येकाग्रमनकरावें॥ वर्षफळयथासां
गऐकावें॥ जिवेंभावेंकरोनियां॥ ५६॥ ब्राह्मणाच्यामुखेंकरून॥ करावेंपंचांग
श्रवण॥ राजामंत्रीस्वामीकोणकोण॥ फळेंसंपूर्णऐकावीं॥ ५७॥ मगकरूनि
विप्रपूजा॥ दक्षणादेवोनिद्विजराजा॥ प्रणामकरावेंआपुल्याकाजा॥ आशी
र्वादसहजांदेतसे॥ ५८॥ पंचांगश्रवणजालियावरी॥ आनंदेंयेगोनिग्रहद्वारीं॥

अश्वगजांचीपूजाकरीं॥ ध्वजषोडशोपचारींपूजावा॥५९॥ ब्राह्मणहस्तेंक-
रावीशांती॥सर्वविघ्नेंदूरहोती॥ ऐसीधरितांशत्रुमती॥ फळप्राप्तीकाथितोंही
॥६०॥ नानाउत्पादांचानाशहोणें॥कलिसंबंधिदुःखजाणें॥ आयुर्देचीवृद्धिपा
वणें॥ लक्ष्मीरहाणेंचिरकाळ॥६१॥ जैशाशुक्लपक्षींचंद्रकळा॥ वृद्धीसिपाव
तीसकळा॥ तयापरीसौभाग्यअटळा॥ ऐसीलीलाशांतीची॥६२॥ इहलोकीं
सुखकारी॥ परलोकींहीऐशापरी॥ जोकांसद्भावदेवोनिकरीं॥ शांतिआदरेंक-
रूनियां॥६३॥ ब्राह्मणद्वारेंकरावीशांति॥ सर्वविघ्नेंदूरहोती॥ऐशीधरोनीशत्रु
मती॥पावेलस्थितीसुखाची॥६४॥ तयाशांतीमाजीजाण॥ मुख्यदेवताचतु
रानन॥ तयाचेंयथाविधीपूजन॥ देवतासुप्रसन्नकरावी॥६५॥ यथाविधीशां-
तीहोतां॥ मगप्रार्थनाकरावयाची आतां॥ त्याचामंत्रत्याचिदेवता॥ आहेनत्व-
तामंत्रामाजी॥६६॥ तोमंत्रकरीतोंलेखन॥ हस्तजोडुनीकरावापठण॥ मग
पुष्पांजळीवाहुन॥ साष्टांगनमनकरावें॥६७॥ ॥मंत्र॥ ॥ॐनमो-
ब्रह्मणेतुभ्यंकामायचमहात्मने॥ नमस्तेस्तुनिमेषायत्रुट्येचनमोस्तुते॥१॥
इतिमंत्रः॥ ॥नानाप्रकारचीपक्वान्नेंकरून॥ आराध्यदेवतेसींसमर्पून॥
मगब्राह्मणसंतर्पण॥ अत्यादरेसींकरावें॥६८॥ दक्षणातांबूलसमर्पून॥ आ
पणकरावेंभोजन॥ पंक्तीसइष्टमित्रस्वजन॥ आनंदेंभोजनकरावें॥६९॥ आ
ल्याअतीताचाआदर॥ करूनियथाशक्तीसत्कार॥ अन्नवाढावेंपोटभर॥ कीर्ती
पसारहोयतेणें॥७०॥ऐसाआनंदाचादिवस॥ लोटतांजायएकवर्ष॥ ऐशासु
खेंदिवसेंदिवस॥ पावेसुखासजन्मवरी॥७१॥ ऐसीयाप्रकारेंकरुन॥ सांगी
तलेंव्रतराजीजाण॥ तेंयथामतीनिरोपण॥ देवोनिअवधानवर्तावें॥७२॥ येक
अब्दसुखहोणारें॥ कांनवर्तावेंग्रंथाधारें॥ जेकांसांगीतलेंचोखटेंखरें॥ अत्या
दरेंकरावेंतें॥७३॥ हेंकेलेंजेंसर्वकथन॥ श्रोतेहोउनिसावधान॥ सुखभोगो-
निहोतिपावन॥ स्वधर्मानुष्ठानेंकरूनि॥७४॥ गोडकथारसाळपाहतां॥ हरपों-
निजायदुःखव्यथा॥ मगतयापरीवर्तेजोतत्वता॥ त्याचीसुखवार्ताकायवर्णूं॥
७५॥ ॥इतिश्रीवर्षप्रतीपदाकथासमाप्तः॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥ ॥



अथसीतळासप्तमीकथाप्रारंभः

श्रीगणेशायनमः ॥ जयजयाजीपरब्रह्मा ॥ जयजयाजीविश्रामधामा ॥ जयजयाजीपूर्णकामा ॥ मनोरमादीनबंधू ॥ १ ॥ जोकां कृपेचासागरु ॥ तयामाझानमस्कारु ॥ सर्वसुखाचाआगरु ॥ करींभवपारु दयानिधे ॥ २ ॥ शुक्लपक्षश्रावणमास ॥ सप्तमीतिथीमाध्यान्हीस ॥ शीतळादेवीच्याव्रतास ॥ करितांसुखवासपावती ॥ ३ ॥ हेंव्रतास्त्रियानींजाणिजे ॥ सौभाग्याकारणें आचरिजे ॥ माध्यान्हव्यापिनीतिथीधरिजे ॥ पूजनकरिजेयाविधी ॥ ४ ॥ प्रातःकाळींस्त्रियांनीउठोन ॥ करावेंमस्तकांवरूनिस्नान ॥ व्रतस्थअसावेंजाण ॥ देवतास्थापनमाध्यान्हीं ॥ ५ ॥ साळीघालावीक्षितीवरी ॥ अष्टदळकाढावेंसुंदरी ॥ पूर्णकलशातेअवसरीं ॥ ठेवींतयावरीअच्छिद्र ॥ ६ ॥ तयाकलशाच्यामाथां ॥ पूर्णपात्रठेवीं आतां ॥ तयामाजीकुंकुमाक्षता ॥ सीतळादेवतास्थापावी ॥ ७ ॥ सुवर्णाचीप्रतिमाकरून ॥ पूर्णपात्रामाजीस्थापून ॥ मगकरावेंपूजन ॥ धारणाध्यानधरोनियां ॥ ८ ॥ ॥ ध्यानमंत्र ॥ वंदेहंसीतलांदेवीं रासभस्थांदिगंबराम ॥ मार्जनीकलशोपेतां शूर्पालंकृतमस्तकां ॥ १ ॥ कुंभेसंस्थापयेदेवीं पूजयेन्नाममंत्रतः ॥ शीतले दहमेपापं पुत्रसौख्यफलप्रदे ॥ २ ॥ धनधान्यप्रदेदेवि पूजांगृण्हनमोस्तुते ॥ ॥ इतिमंत्रः ॥ ॥ ऐशामंत्रेंकरूनिध्यान ॥ करावेंषोडशोपचारपूजन ॥ गंधपुष्पअक्षताजाण ॥ वस्त्राभरणअर्पावें ॥ ९ ॥ हळदीकुंकुमवाहीं ॥ कंठसूत्रताडपत्रतेंही ॥ कंचुकीकंकणा-


सही ॥ नानापरिमळवाहींतयासीं ॥१०॥ धूपदीपनैवेद्य अर्पावा ॥ प्रदक्षिणा तांबू
ल ठेवावा ॥ भावें नमस्कार करावा ॥ मार्गपावावासोज्वळ ॥ ११ ॥ यावे दधिभाता
चें वायन ॥ करूनि ब्राह्मणाचें पूजन ॥ तांबूलदक्षिणादेऊन ॥ विप्रसमाधान करा
वें ॥ १२ ॥ पूजन होतां कथानक ॥ ब्राह्मणमुखें सकळिक ॥ जो कां कल्याणदायक
तोंचि ऐकसावचित्तीं ॥ १३ ॥ सागराचें करोनि मंथन ॥ रत्नें काढिलीं चतुर्दश जाण ॥ ते
वीं अष्टादशपुराण ॥ शोधुनीं कथन करितों हें ॥ १४ ॥ ही सुरस कथा सुरेख ॥ भवि
ष्योत्तर पुराणीं देख ॥ श्रीकृष्णें सांगीतली ऐक ॥ ती सकळिक श्रवण करीं ॥ १५ ॥ ह
स्तिनापुरा माझारी ॥ इंद्रद्युम्न नामधारी ॥ तयाराजयाची सुंदर नारी ॥ नाम निर्धा
री धर्मशिला ॥ १६ ॥ ते तों महापतिव्रता देख ॥ जिचा त्रैलोकीं लौकिक ॥ परमउदार दा
नधार्मिक ॥ जियेसकळिक वानिती ॥ १७ ॥ जाहला येक पुत्र तिजला ॥ महाधर्म हें
नाम जयाला ॥ आणि जैसी पूर्णचंद्राची कळा ॥ कन्या सुदाळ शुभकारी ॥ १८ ॥ ना
मासारिखी जिची कृती ॥ स्वरूपें पद्मा तो प्रकाशोक्षिती ॥ गुणें पाहतां केवळ सती ॥ जै
सी दमयंती नयापरी ॥ १९ ॥ सामुद्रिकलक्षणें करूनि जाण ॥ युक्तअसे ती परिपूर्ण
॥ पद्महस्ता आकर्णनयन ॥ सुहास्यवदन जियेचें ॥ २० ॥ ते कन्या जाली उपवर ॥
पिता पाहे दृष्टिभर ॥ इंद्रद्युम्नें केला विचार ॥ करावें स्वयंवर कन्येचें ॥ २१ ॥ करूनि
मनाचा निर्धार ॥ कन्यके योग्य आहे वर ॥ नाम सुमित्र प्रतापशूर ॥ त्याचा कुमर योग्य
जावा ॥ २२ ॥ ऐसें मनीं आणोनियां ॥ प्रधाना धाडिला तये ठाया ॥ मूर्त निश्चय
करूनियां ॥ आला कळवाया राजेंद्रा ॥ २३ ॥ तो पुत्र महागुणाची खाण ॥ ईश्वरभा
ग्यें मिळाला जाण ॥ तया करावें कन्यादान ॥ योजिलें लग्न उत्तम दिनीं ॥ २४ ॥ मां
डिला समारंभ आपण ॥ मंडप घातला दारुण ॥ हिरे माणिक पाचू जडवून ॥ केला
विस्तीर्ण सुशोभित ॥ २५ ॥ देशोदेशींचे राजे आणिले ॥ सभेमाजी येवोनि बैसले
कौंडण्यपुराहूनि निघाले ॥ विवाहा चालिले आनंदें ॥ २६ ॥ उल्हाट यंत्रांचा भडमार
नाना वाद्यांचा गजर ॥ घेउनी संगें सैन्यभार ॥ सामोरे अपार चालिले ॥ २७ ॥ परस्परें
दोघां निभेटी ॥ मंडपीं आणोनी बैसविती ॥ वस्त्रालंकार भूषणें देती ॥ वरा पूजि
ती आनंदें ॥ २८ ॥ सावधान ह्मणोनी मंत्राक्षता ॥ टाकिल्या उभयतां त्या माथा ॥
ब्राह्मण बोलती सर्वथा ॥ यांच्या कथा जनीं गाती ॥ २९ ॥ जाहला विवाहाचा सोह

ळा॥ आंदणदीधलेंभूपाळा॥ पोषाखदेउनीसकळां॥ सर्वभूपाळा बोळविलें ॥३०
पुत्रास हस्तमित्रवीर॥ जोकांप्रद्युम्नउदारधीर ॥ तयासीम्हणे सत्वर॥ निरोपनि
धारदेईआम्हां॥३१॥ आतांकौंडण्यपुरासी॥ पेवोनितुमच्याकन्येसी॥ निरो·
पावेंस्वस्थमानसीं॥ ऐसेंआनंदेंपुसतसे॥३२॥ मातापित्यासिकन्यका॥ नमन
करूनी प्रार्थीऐका॥ आज्ञाद्यावीमजबाळका॥ सासरींदेखाजावया॥३३॥ आ-
ज्ञादेनांमायबापें॥ रथावरीचढेआनंदरूपें॥ तोंउपदेशिलीप्रद्युम्नप्रतापें॥ जाती
लपापेंनासूनी॥३४॥ आपुल्यास्वशुरगृहींजाऊन॥ व्रतकरावें आचरण॥ सीत
ळासप्तमीचेंजाण॥ विसरूनकोआणमाझी॥३५॥ ऐसेंऐकतांकन्याबोले॥ ब्रह्म
देवेंजेंसांगीतलें॥ तयातेंपाहिजेऐकिलें॥ निश्चयेंधरिलेंम्यांतद्दयीं॥३६॥ मु
ख्यऐकेंपतिव्रताधर्म॥ तयाहूनिस्त्रियांसअन्यकर्म॥ नेणेंदुसऱ्याव्रताचाधर्म॥
दावीअधर्ममजलागीं॥३७॥ परीतूंपितादेवासमान॥ तुझीआज्ञावंदनकरू
न॥ आतांयेथेंचीवासकरून॥ करित्येंआचरणव्रतातें॥३८॥ ऐसेंवदोनीपती
सहित॥ राहिलीपित्याच्यानगरांत॥ करूनिअंतःकर्णस्वचित॥ पुढीलवृत्तांत
परियेसीं॥३९॥ सौभाग्यदेईनिर्धारीं॥ वैधव्यपणाचानाशकरी॥ ऐशाव्रतातें
आचरी॥ निश्चयअंतरींधरोनियां॥४०॥ आपुलापुरोहितपत्नीसहीत॥ घेऊनि
निपाल्कीसमवेत॥ जातांजालीअरण्यांत॥ प्रमभरीततेकाळीं॥४१॥ व्रतस्त्वरा होनी
आपण॥ करोनिसचैलस्नान॥ एकासरोवरालागुन॥ पहातांमनउल्हासे॥४२॥
करावेंयेथेंचव्रत॥ तोंवर्तलेंअद्भुत॥ पाठीनाहींपुरोहित॥ जालेंगुप्तसरोवर॥४३
निद्रालागलीपुरोहिता॥ मार्गामाजीजातांजातां॥ तोनदिसेचीतत्वता॥ खेदचि-
त्ताबहुजाला॥४४॥ मजवरीदेवीकोपली॥ सर्वसंगतीमाझीगेली॥ जीकांजगा
चीमाउली॥ पाउलापाउलींआठवित्ये॥४५॥ ऐसेंवदोनीभयभीत॥ चकलीफि
रेअरण्यांत॥ श्रमजाहलें तयेबहुत॥ जाहलेंचित्तउद्विग्न॥४६॥ इतुकीयामा·
जीअकस्मात॥ वृद्धस्त्रीप्रगटहोत॥ राजकन्येलागींम्हणत॥ अंतरींभीननरा
हावें॥४७॥ चीरंजीवीभर्ता तुझा॥ आशीर्वाद येईमाझा॥ हेतूपुरवीलतुझा
करितांपूजादेवीची॥४८॥ आतांयेईमाझ्यामागें॥ दावितोंसरोवरवेगें॥ पूजाक
रोनीपाईलागें॥ प्रगटेदेवेंसीतळाते॥४९॥ ऐसेंवदोनीवेगेंसि॥ घेऊनिगेलीसरो

वरासीं ॥ आतां षोडशोपचारें पूजेसी ॥ सीतळासप्तमीसी करावें ॥ ५० ॥ पितयाचीआज्ञास्मरोन ॥ मग घालोनी आसन ॥ बैसलीसे एकाग्र मन ॥ लाविलें ध्यान देवीकडे ॥ ५१ ॥ पूजासामग्री सकळ ॥ भातावरी रेखिलें अष्टदळ ॥ कलशपूर्ण पात्र निर्मळ ॥ प्रतिमा सोज्वळ स्थापिली ॥ ५२ ॥ त्यासुवर्ण प्रतिमेचें ध्यान ॥ करूनि आवाहन पूजन ॥ षोडशोपचार अर्पून ॥ जाली प्रसन्न सीतळा देवी ॥ ५३ ॥ ह्मणे माग असे इच्छित ॥ सीतळादेवी असे वदत ॥ शुभकारी ह्मणे सौभाग्ययुक्त ॥ देह विपरीत नव्हावा ॥ ५४ ॥ वैधव्य न यावें कोणें काळीं ॥ तुझें व्रत करिती ज्या बाळी ॥ स्मरतां उभी राहें जवळी ॥ पुरवीं आळी हे माझी ॥ ५५ ॥ ऐसें वरप्रदान मागतां ॥ देउनी अदृश्य जाली देवता ॥ सख्यां सहीत परतोनि आतां ॥ जावें माता सदनासीं ॥ ५६ ॥ राजकन्या मार्गीं जात ॥ सर्पडंशें करूनि घात ॥ मार्गीं माजी पडलें प्रेत ॥ ह्मणे पुरोहित आपुला ॥ ५७ ॥ आकांत स्त्रियेनें मांडिला ॥ काय बोले राजकन्येला ॥ मीं सहगमनाचा नेम केला ॥ वैधव्य मज ला सोसेना ॥ ५८ ॥ पतीसहगमन करीं सहज ॥ प्राप्त होईल स्वर्ग मज ॥ वैधव्यदुःखाची गजबज ॥ न सोसवे मज सर्वथा ॥ ५९ पुरोहिताची स्त्री बोलत ॥ अग्नी जाळी पतीसमवेत ॥ तोंयेथें राहावें सावचित्त ॥ मग नगरांत जाइंजे ॥ ६० ॥ ऐसें ऐकतां भाषण ॥ राजपुत्रीस दुःख दारुण ॥ सीतळादेवीचें करूनि स्मरण ॥ मांडिलें स्तवन सप्रेमें ॥ ६१ ॥ प्रसन्न जाली देवता ॥ ह्मणे इच्छित माग आतां ॥ उठवीं आमुच्या पुरोहिता ॥ भाषण ऐकतां काय बोले ॥ ६२ ॥ तूं वहू कोमळ हृदयाची ॥ दया करिसी कुळगुरुची ॥ तरी केला संग्रह वेंचीं ॥ नाहे दुःखाची तुज बाधा ॥ ६३ ॥ माझें तुवां केलें व्रत ॥ तें पुण्य अर्पावें त्वरित ॥ ऐसें बोलोनि पांमात ॥ देवी गुप्त जाली तेथें ॥ ६४ ॥ मग ऐकोनी राजबाळा ॥ पुण्य अर्पीत पे वेळां ॥ तया सुखाचा सोहळा ॥ ब्रह्मबाळा भोगितसे ॥ ६५ ॥ निद्रिस्तापरी अकस्मात ॥ ब्राह्मण उठिला त्वरित ॥ अंग मोडोनी ह्मणत ॥ करीं व्रत राजकन्यके तूं ॥ ६६ ॥ सकळ व्रत्तांत जो जो जाहला ॥ तितुका समजाउनी तयाला ॥ ब्राह्मणस्त्रियेस आनंद जाला ॥ त्याच्या मोला पार नाहीं ॥ ६७ ॥ इतुकें जालियावरी ॥ ब्राह्मण विस्मित जाला अंतरीं ॥ ह्मणे धन्य ही राजकुमरी ॥ कीर्ति निर्धारीं त्रिभुवनी ॥ ६८ ॥ काळमुखांतुन मोडविलें मज ॥ अक्षयी सौभाग्य राहो तुज ॥ स्तुती करितां बोलें

राजा॥आज्ञामजदेई आतां॥ ६९॥ पतिआज्ञाविप्रस्त्रीस॥ होतांनिकेलें व्रतास॥ होउनीसंतोष मानस॥पावलीस्वरवास अंतरीं॥ ७०॥ तेथूनिमार्गक्रमित॥ राजपुत्रीब्राह्मणा सहित॥ चाललीपुढें अकस्मात॥ जाहलें ग्रामविघ्न ऐसें॥ ७१॥ राजकुमरीचाभ्रतार॥ करितां अरण्यांतशिकार॥ तेथेंकाळसर्पें अनिवार॥डंखोनि भूमीवरपाडिला॥ ७२॥ मार्गीजातां भूपती॥ पडला दृष्टींपाहेक्षितीं॥ आक्रांतमांडिलानिश्चितीं॥ माझीगतीकोणती॥ ७३॥ पतीपावतां मरण॥ शुभकारी झांकीनयन॥ दुःखीत होउनी अंतःकरण॥ विव्हळ जाणपडियेली॥ ७४॥ वाटे माझ्या अंगावरी॥ आकाशकोसळलें निर्धारी॥ आतांकैसें जन्मवरी॥ दुःखडोंगरीं असावें॥ ७५॥ पूर्वीम्यांकोणाचाकेलाघात॥ विघडपाडिलाभ्रतारस्त्रींत॥ ईश्वरें ननेलेंमज समवेत॥ ऐसीयादुःखांतठेविलें॥ ७६॥ मनामाजीविचारकरून॥ केलेंसीतळादेवीचेंध्यान॥ मजवरीपडलेंनिर्वाण॥ धांवेंजाणयासमया॥ ७७॥ ऐसाऐकोनियांधांवा॥ देवीप्रत्यक्षपावली भावा॥ जोकांजीविंचाविसावा॥ तोचीघावाउठवोनी॥ ७८॥ गगनींचमकतीसौदामिनी॥ तेणें प्रकाशेमेदिनी॥ ऐसी दिव्यस्वरूपेंकरोनी॥ प्रगटोनिसन्मुखराहिली॥ ७९॥ अतिकोमलकांतीसुंदर॥ नानाप्रकारचे अलंकार॥ कुंकुमरेखिलें सुंदर॥ किरीटमनोहरजडितांचा॥ ८०॥ तीच्यातेजापुढेंजाण॥ चंद्रसूर्यजातीलपोन॥ स्वरूपपहातां झांकतीनयन॥ ऐसेंध्यानदेखियेलें॥ ८१॥ जेंध्यानयोगियांनातुडे॥ तेंपाहिलेंउभेंपुढें॥ चरणीमस्तकठेऊनिपवाडे॥गाईरोकडेराजबाळा॥ ८२॥ देवी ह्मणेसांगकारण॥ कांकेलेंमाझेंचिंतन॥ सतीह्मणेंकाळेंयेउन॥ नेलेप्राणममपतीचे॥ ८३॥ देवताऐकोनि तिच्याबोला॥ माझ्याव्रताचाप्रतापऐकिला॥ नयेवैधव्यकोणाला॥ ऐसालीलाअसेमाझी॥ ८४॥ आतांसोडोनीदेईंग्लानी॥ पतीनदेंकाळाहातीं॥ अभयवचन हेंनिश्चितीं॥ जाईंसतीपतीजवळी॥ ८५॥ आतांजाउनीत्वरित॥ पतीच्याशरीरीं फिरवींहात॥ प्राणप्रघटोनीदेहांत॥ उठेलगतजाळानो॥ ८६॥ राजकन्याजाऊनिलवलाहीं॥ आंगावरीहातफिरवून पांहीं॥ निजलाजैसाजागाहोई॥ तैसातोही उठेवेगेंसी॥ ८७॥ सर्वांसिआनंदजाला॥ एकचीजयजयकारकेला॥ ऐसाभाग्योदयउदेला॥ दानधर्मकेलाअनिवार॥ ८८॥ देवीचीप्रार्थनाकरून॥ ह्मणतीआ

स्त्रींस्त्रियादीन ॥ तयां कृपादृष्टीन्याहाळून ॥ वैधव्य नसावें कवणासीं ॥ ८९ ॥ देवी
ह्मणे कोणींहीजाण ॥ माझें व्रत करिती आचरण ॥ तया स्त्रियांसी वैधव्य जाण ॥
नये वरदान हें चिमाझें ॥ ९० ॥ देवीवदोनीगुप्तजाली ॥ पतीसह कन्यका नगरा आ-
ली ॥ दानधर्म करिती जाली ॥ धन्यत्व पावलीं मायबापें ॥ ९१ ॥ राजकन्या पतिसम-
वेन ॥ मायबापासीं वंदन करीत ॥ जातों आपुल्या नगरांत ॥ घेऊनिजात आज्ञेतें ॥
९२ ॥ ऐशा व्रतप्रभावें करून ॥ विप्रस्त्री राजकन्या जाण ॥ पुत्रपौत्रादि सौभाग्यव
र्धन ॥ जाली जाण प्राप्त तया ॥ ९३ ॥ ऐसें या व्रताचें महिमान ॥ जे कां करिती नेमें करु
न ॥ तया देवी प्रसन्न होऊन ॥ करी समाधान सर्वोपरी ॥ ९४ ॥ ज्या कोणी स्त्रिया जा
ण ॥ हें व्रत करिती आचरण ॥ तया संकट न पडे जाण ॥ करी आचरण यथाविधी ॥
॥ ९५ ॥ शीतलासप्तमी व्रत कीजे ॥ सौभाग्य अखंड पाविजे ॥ राजकन्येपरी आनं
द भोगिजे ॥ दारिद्र्य जाइजे देशाधडी ॥ ९६ ॥ पुत्रपौत्र आदि करून ॥ संतती वृद्धी हो
ईल जाण ॥ अल्पायुषी न होय कोण ॥ ऐसें वचन देवीचें ॥ ९७ ॥ सर्वसिद्धी कारक
व्रत ॥ तयावरी ठेवूनि प्रीत ॥ करील जी कां देवि भक्त ॥ होईल मुक्त सर्वथा ॥ ९८ ॥
श्रीकृष्णाजो कां आठवा ॥ त्याणें सांगितला कथेचा ठेवा ॥ जो कां स्त्रियांलागीं वि
सावा ॥ तो प्रकार दावा भवांसीं ॥ ९९ ॥ ऐशा भावें करूनि जाण ॥ केलें प्राकृत वर्णन
॥ तयावरी भाव ठेऊन ॥ कथाश्रवण करावी ॥ १०० ॥ ॥ इतिश्रीसीतळासप्त
मीकथा समाप्त ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्रीरस्तु ॥ ॥



अथविजयादशमीकथाप्रारंभः

श्रीगणेशायनमः॥ श्रीसरस्वत्यैनमः॥ श्रीगुरुभ्योनमः॥ श्रीकुलदेवतायैनमः
॥ ओंनमोजीगौरीकुमरा॥ सकलविद्येच्यासागरा॥ तूतेंस्मरतांबुद्धिचापसारा॥
ग्रंथविस्तारा होतसे॥ १॥ ऐसाजोकांज्ञानघन॥ निर्गुणनिराकारसनातन॥तो
तूंसगुणजालासीआपण॥ भक्तांसिजाणरक्षावया॥२॥ तुझ्यासगुणपणा
चेंवर्णन॥चतुर्भुजआणिगजवदन॥ विशाळदोंदशोभायमान॥आकर्णनयन-
विराजती॥३॥ चरणकमळअतिकोमळ॥ कटिनागबंधसबळ॥ दंतपंक्तीचाझ-
ळाळ॥ भासतकेवळहिऱ्यापरी॥ ४॥ नमोसद्गुरुचिन्मयखाणी॥जगव्याप-
कदिनमणी॥अज्ञानतमनिरसोनी॥ लाविलेंध्यानींआपुल्या॥ ५॥ ऋध्दिसि
द्धिसरस्वति॥ वंदीनयाचरणाप्रती॥जेकांसाधूविमलमती॥ भाविकचित्तींनमि
येले॥ ६॥जेकांसज्जनश्रोतेवक्ते॥ कृपाळूजेभावार्थभोक्ते॥ माझींवचनेंजीप्रा-
कृतें॥ सांगेनचित्तेतयांपासीं॥ ७॥आतांजीकांउपास्यदेवता॥ वदवीजोकार
सालकथा॥रसनावाहेअमृतसरिता॥ इष्टदैवताप्रणिपातु॥८॥ मागेंवर्णिलें
कथानक॥वर्षफळातेंपाहतीलोक॥ विजयादशमीमहात्मकरेख॥ तोकथा-
नकंऐकापुढती॥ ९॥ जोकाआनंददायकदिवस॥ विजयादशमिह्मणतीतया
स॥ तोकांशरदृतूआश्वीनमास॥उत्साहदिवससर्वांचा॥१०॥ सूर्योदयापासू
नअसावीतिथी॥ वीसघटकानंतरशास्त्रमती॥ तीदशमीव्रतासीयोग्यह्मण
ती॥श्रवणनक्षत्रतेदिनीअसावें॥११॥ऐसीउत्तमतिथीपाहीं॥ येकादशीयु
क्तदशमीतेही॥ श्रवणनक्षत्रतिथीच्याठायीं॥ घ्यावीतेहीउक्तअसे॥१२॥ ज
रीवीसघडीदशमीअसे॥श्रवणनक्षत्रतयादिनीनसे॥ तरीतीघेऊनयेंशास्त्र
असे॥व्रतराजपरीसंबोलिला॥१३॥ ऐसेंतिथीचेंऐकेंप्रमाण॥ पुरेंविधीयुक्त-
आचरण॥ तेंहीकथितोंसंपूर्ण॥ धरुनीप्रमाणचलावें॥१४॥ ऐसियाविजय
दायकतिथीसीं॥ मांगलिककरावेंस्नानासीं॥ नित्यनैमित्तिककर्मासीं॥ सर-
स्वतीपूजनासींकरावें॥१५॥ जीकांहोतांप्रसन्नजाण॥ जगामाजीवाढेलमान
॥तयाचेंषोडशोपचारेंपूजन॥ एकाग्रमनेंकरावें॥१६॥ उत्तमप्रकारेंपदार्थनिर्मु

न॥ करावेंषड्रसांचेंसेवन॥ पंक्तीसघेणेंसवाष्णब्राह्मण॥ करणेंभोजन स्वस्थचि
त्तें॥ १७॥ दिसपटीकाभरलीयाउपरांत॥ शिमोल्लंघन करावेंत्वरित॥ वस्त्रालंकार-
भूषणमंडित॥ सुहृद्जनसहित निघावें॥१८॥ समागमेंनानावाद्यघोष॥ अश्वआ
दिकरूनीवाहनेंविशेष॥ आरूढ होउन उत्तरदिशेस॥ जावेंशमीसआणावया॥१९
तेथेंगेलियावरीजाण॥ पंचोपचारशमीपूजन॥ धूपदीपनैवेद्यसमर्पुन॥ तांबूलद-
क्षणाअर्पावी॥२०॥ मगसर्वांनीकीजेपदक्षिणा॥ ईशान्येसमुखकरोनीप्रार्थना॥
लिहिलेमंत्रवदोनिवंदना॥ करूनिसुवर्णलुटावें॥२१॥ ॥ मंत्र॥ ॥ शमी
शमयते पापं शमी शत्रुविनाशिनी॥ अर्जुनस्य धनुर्धारी रामस्य प्रियवादिनी॥२२
॥ शमीशमयतेपापं शमीलोहितकंटके॥ धारिण्यर्जुनबाणानां रामस्य प्रियवा-
दिनी॥२३॥ करिष्यमाणयात्रायां यथाकालं सुखं मया॥ तत्रनिर्विघ्नकर्त्रित्वंभ
वश्रीरामपूजिते॥२४॥ ॥ ऐशामंत्रेंप्रार्थनाकीजे॥ शमीवरुती अक्षता टाकि
जे॥ आणिमुळासहशमीकाढिजे॥ ग्रहीयेइजेआनंदें॥२५॥ शमीअर्पावीदेवा
सी॥ मगपुजावाब्राह्मणासी॥ इष्टमित्रसकळजनासी॥ शमीसुवर्णासिंअर्पावें॥
२६॥ परस्परेंद्यावें घ्यावें॥ येकमेकांनमनकरावें॥ ऐसेंव्रतआचरावें॥ बहुस
द्भावेंकरूनियां॥२७॥ आतांमनीशंकाआलीपाही॥ शमीवृक्षज्याठाईनाही॥
त्याणीकवणापुजावेंपाही॥ सांगेलवलाही सकळासी॥२८॥ वनराजवृक्षम्ह
णतीजया॥ सद्भावेंकरूनीपूजावेंतया॥ येणेंमंत्रेंप्रार्थुनियां॥ देईलविजयात-
यापरी॥२९॥ ॥ मंत्र॥ ॥ आदिराजमहाराजवनराजवनस्पते॥ इष्ट
दर्शनमिष्टान्नं शत्रूणांचपराजयः॥३०॥ ॥ ऐशामंत्रेंकरूनिजाण॥ करा
वीवनराजप्रार्थना॥ पूर्वविधानेंकरूनिपूजना॥ घेउनीसुवर्णाजाइंमग॥३१
येणेंप्रकारेंसकळजनें॥ वर्तावें आपुल्याजयाकारणें॥ आतांसार्वभौममांडलि
कानें॥ करावीपूजनेंकोणेपरी॥३२॥ अत्तरगुलाबचमेलीदेख॥ अर्गजादीकरूनी
सुगंधिक॥ आंगाळाउनीपरिमळसुरेख॥ स्नानलौकिककरावें॥३३॥ मगसा
रूनीसकळक्रिया॥ दानधर्मकरूनिसदया॥ ढालघ्यावीचंद्रपाडूनियां॥ शत्रुवधा
वयाकारणें॥३४॥ नानाप्रकारचींवस्त्रें सुरेख॥ मंदीलशिरपेंचतुराअमोलिक॥
अंगभूषणेंमुद्रादीक॥ शृंगारसकळिक साजिरा॥३५॥ कोणेंवेळींकिरीटकुंडले

दैत्यांसुदें उपाय नचले॥ कोणी मेले कोणी गेले॥ युद्ध विलुब्धे जयापरी॥ ४०॥ मेघडंबरें गडद येती॥ वायू रूद्रतांचा वितुळती॥ तैसी जाली दैत्यां गती॥ नचले मर्त्य कवणाची॥ ४१॥ ऐसा समरचमत्कार॥ दैत्यां दावित सुरवर॥ जों पानले निशाचरदुर्धर॥ सैन्य अपार घेवोनी॥ ४२॥ देवें पहातां बहुसमाज॥ ह्मणती न मिळे जय आजं॥ आतां राखील ईश्वरलाज॥ तरीच काज होय हें॥ ४३॥ मेघनादें करोनी गर्जती॥ क्रोधें अनिवार धांवती॥ ह्मणती मारूं शचीपती॥ देऊं गती देवांसही॥ ४४॥ ऐसे गर्जोनी धांवती॥ भीती नुपजे इंद्राप्रती॥ यमकुबेर थरथरां कांपती॥ होईल गती काय नेणो॥ ४५॥ ह्मन मरखें सकळांसीं॥ अभय दीधलें देवांसी॥ युद्ध जरी करिती अहर्निशी॥ तरी जयासी पावेन मीं॥ ४६॥ ऐसे ऐकतां अभयवचन॥ सकल देवें भीती सोडुन॥ युद्ध करिती दारुण॥ दैत्य कंदन मांडिलें॥ ४७॥ कोणी खड्ग कोणी तोमर॥ अरगळा घेती निशाचर॥ कोणी मुसळ कोणी डोंगर॥ पाषाण खडतर टाकिती॥ ४८॥ कोणी सोडिती नीर्वाणशक्ती॥ कोणी शरें भानुमंडळ झांकिती॥ एका बाणाचे सहस्त्रबाण होती॥ कोणी धांवती मल्लयुद्धीं॥ ४९॥ शक्तीनें शक्ती तोडी इंद्र॥ बाण सोडी अर्धचंद्र॥ तेणें दैत्यांचे भंगे भद्र॥ वाहे समुद्र रुधिराचा॥ ५०॥ तया रणामाझारी॥ मोड होय निशाचरीं॥ देवें वाजविल्या आनंदभेरी॥ गेले गजरीं इंद्रभुवना॥ ५१॥ जयवाद्यांचे गजरीं॥ देव येतां स्वर्गद्वारीं॥ घेऊन येती आरत्या करीं॥ मंगलशब्द कारी देवांगना॥ ५२॥ इंद्र-आसनीं बैसला॥ देवें कुसुम वर्षाव केला॥ रंभा उर्वशी गाती लीला॥ नृत्य कुशला करिताती॥ ५३॥ रक्षाबंधन महिमा अपार॥ कृष्ण सांगे निर्धार॥ श्रवण करी कुंतीकुमर॥ घाला शचीवर देवां सह॥ ५४॥ दैत्यपराभव होतां जाण॥ त्रैलोक्यविजयी इंद्र आपण॥ तैसा करी जो रक्षाबंधन॥ जयपरिपूर्ण तया होय॥ ५५॥ ऐसा व्रतोद्भवाचा ओघ॥ सुखसंतती होय अमोघ॥ दारिद्र अपजय हर्षे रोग॥ होईल चांग अभिष्टतें॥ ५६॥ धर्मराज ह्मणे देवांसी॥ रक्षाबंधनाच्या सांगें विधीसी॥ तो करावा कोणे दिवशीं॥ सांगें आह्मासीं यथार्थ॥ ५७॥ जगनियंता वासुदेव॥ सांगे धर्माचा देखू निभाव॥ अघाचा मोडील ठाव॥ स्मरतां नाव रामाचें॥ ५८॥ तैसें या व्रतें करून॥ जाती रोग समूळ जाण॥ सुखसंपत्ती समा

धान॥ विजयपूर्णहोतसे॥ ५९॥ कृष्ण ह्मणेधर्मासीं॥ सावधहोईमानसीं॥
केसेंकरणेंनंथरियेसी॥ चहूंवर्णासीसुखदातें॥ ६०॥ पूर्वीलसांगीतलामास॥
शुक्लपक्षपूर्णादिवस॥ प्रातःकाळसमयास॥ करींस्नानास मांगलिक॥ ६१॥ श्रु
तिस्मृतीविधानेंकरुन॥ स्नानसंध्यादेवतार्चन॥ करूनिदेवपितृतर्पण॥ उपा
कर्मेजाणकरावें॥ ६२॥ श्रावणीजालियावरीजाण॥ भोजनकरून साधींअपरा
ण्ह॥ नंयेवेळींरक्षाबंधन॥ करवीं आपण दक्षणकरी॥ ६३॥ कार्पासवस्त्रघ्या
वें॥ अथवारेशमीअसावें॥ हरिद्रेंकरूनीभिजवावें॥ पिवळेकरावेंसोज्वळ॥
६४॥ अक्षताकरूनीपीत॥ राईघालुनीतयांत॥ गाईचेंशेणजयांत॥ दूर्वांस-
हीतअसावें॥ ६५॥ ऐसेंपदार्थघेउन॥ वस्त्राच्यामध्यभागींठेउन॥ मगग्रंथि
कामारुन॥ पुढेंविधानऐसेंकरीं॥ ६६॥ संमार्जनकरुनीक्षिती॥ साळघालो
नीतयावरुती॥ धान्यकुंभभरूनिनिश्चिती॥ डांगरमाथींठेवावा॥ ६७॥ तया
वरीग्रंथीठेउन॥ आपणआसनींबैसून॥ ब्राह्मणसमाजबोलाउन॥ पुण्याहवा
चनकरावें॥ ६८॥ करवीं सुवासिनीन्याहातीं॥ मंगलदायकआरती॥ आपु-
ल्यापुरोहिताकरवींप्रीती॥ ग्रंथिकाहस्तींबांधाव्या॥ ६९॥ ग्रंथिकाबांधावया
चामंत्र॥ जोकांविजयदेणारापवित्र॥ तेजवाढेलजैसामित्र॥ मनपवित्रहोतसे
॥ ७०॥ ॥ मंत्र ॥ ॥ येनबद्धोबळीराजा दानवेंद्रोमहाबलः॥ तेनत्वाम
भिवध्नामिरक्षेमाचलमाचल॥ ॥इतिमंत्रः॥ ॥ यामंत्रेंकरावेंजाण॥ च्यारी
वर्णेरक्षाबंधन॥ करूनिब्राह्मणाचेंपूजन॥ विपुलधन अर्पावें॥ ७१॥ कृष्णह्म
णतीऐसाविधी॥ करीतांहोयजयसिद्धी॥ ऐसाजोकांप्रमादी॥ तोसुजनिवेदि
लासत्यत्वें॥ ७२॥ जेणेंकरोनीदोषरहित॥ निर्दोषत्वेंराहातेंचित्त॥ सुखहोईल
अद्भुत॥ संवत्सरपर्यंतनिर्धारें॥ ७३॥ हेंरक्षाबंधनपौर्णिमेसी॥ भद्राअसतां
त्यावेळेसी॥ व्यर्थजाईल ह्मणोनितुजसी॥ सूचकबंधनासीकरूनये॥ ७४
भद्रानसतांकरावें॥ रक्षाबंधननिर्धारें॥ नेणेंफलानेंपावावें॥ व्रतसंपादावेंऐशा
परी॥ ७५॥ तयादिनींसायंकाळीं॥ ऐसें करावेंसकळीं॥ वरुणाची पूजानानाप
रिमळीं॥ सांगेवनमाळीकरावया॥ ७६॥ पर्जन्यकाळामाजीजाण॥ सागरखव
ळे अतिदारुण॥ ह्मणोनिपूजावावरुण॥ येईलशांतपण सिंधुलागीं॥ ७७

जोकांस्वामीसागराचा॥ तोचीसरवा इंद्राचा॥ आदर करावा तयाचा॥ सद्भावाचा भुकेला॥७८॥ पंचोपचारकरूनिपूजन॥ नैवेद्य तांबूल अर्पुन॥ दक्षणा श्रीफळ देउन॥ साष्टांगनमनकरावें॥७९॥ प्रार्थनाकरूनीसागरांत॥ नारळ अर्पावात-यांत॥ मग अब्धीहोय शांत॥ रूढीजगांत ऐशापरी॥८०॥ मंगळ वाद्यांचे घोष॥ वाजतगाजतस्वग्रहास॥ हर्षयुक्तकरूनि मानस॥ सुखरूपें विलासभोगावा॥ ८१॥ कृष्णसांगे व्रतसार॥ धर्माचें स्वरूपें अंतर॥ करूं आपण निर्धार॥ आलाविचारमानसीं॥८२॥ ऐसें कोणीजेवर्तती॥ तयानुपजेदुर्मती॥ घडेलसज्जनसंगती॥ वाढेलकीर्तीजगामाजी॥८३॥ धर्मवासनातयाहोय॥ अधर्मबुद्धीलयासिजाय॥ कार्यासीजातांअपाय॥ तोहीउपायहोतसे॥८४॥ ऐसें व्रतराज्ञा माजीअनेक॥ सांगीतलेंव्रताचेंकौतुक॥ परीतयांतूनजोकरीलऐक॥ तोचीभाविकजाणावा॥८५॥ निश्चयनाहींवचनावरी॥ सकलव्रताचेंशास्त्र-करी॥ सांगनोहेऐशापरी॥ चित्तींधरीविश्वास॥८६॥ व्रतयेकचीकरावें॥ निश्चयधरूनीसद्भावें॥ तेणेंचिफळपावावें॥ ऐसेंदेवेंसांगीतलें॥८७॥ तेंकथितोंमंदमती॥ परीसक्षेंधरावेंचित्तीं॥ हरपोनिमनाचीभ्रांति॥ धरावीशांतीनित्यानें॥८८॥ असो आतांपुढीलकथानक॥ दुजियाव्रताचाऐक॥ तयामाजी सकळिक॥ आनंददेखपावती॥८९॥ येकापरीसयेकअधिक॥ व्रताचीअसे शोभादेख॥ जेणेंकरोनीसर्वसुख॥ पावतीदेखवर्णचारी॥९०॥ केलादेहधारणजाण॥ इच्छितसुखालागुन॥ असुखअसावें अरेंमन॥ कोणाचेंजाण कल्पीना॥९१॥ म्हणऊनकोणत्याहीमिसेंसदया॥ ईश्वरींलागावेंलय॥ दावितीअनेकउपाय॥ ऐसीसोययोजिती॥९२॥ व्रतवैकल्येंकरून॥ व्हावेंदेवब्राह्मणपूजन॥ दानधर्मसत्कर्मसाधन॥ होतांजनमुक्तहोत॥९३॥ ऐशाहेतूनेंसाधु॥ करितीजनालाबोधु॥ जयाकर्मेंपरमानंदू॥ होतांभवसिंधू तरेल॥९४॥ ॥ इतीश्रीनारळीपोर्णिमाकथासमाप्त॥ ॥ ॥

॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥ ॥ श्रीरस्तु॥ ॥ शुभंभवतु॥ ॥



अथसोमवती कथा प्रारंभः

श्रीगणेशायनमः॥ ॥ ओंनमोजीवेल्हाळा॥ अतिसकुमारागोरीबाळा॥
धांवपावगा कृपाळा॥ करींकुरवाळादीनातें॥१॥ तूंजरीदयाकरिसी॥ तरी
ग्रंथपावेविस्तारासी॥ मंदमतीक्षाधिनासी॥ घालींभोजनासीमजलागीं॥२
तूंसद्गुरू दयासागर॥ दीनजनाकरीभवपार॥ शरणागतासीं आधार॥ तुज
लानमस्कारअसोमाझा॥३॥ ब्रह्मवृंदजेकासकळ॥ तयांचरणीशिरकम-
ळ॥ देईअंगीभक्तिबळ॥ होउनीकृपाळसकळिक॥४॥ सूतनैमिषारण्यामा
झारी॥ कथासांगतीविस्तारीं॥ शौनकादिऋषीअंतरीं॥ संतोषसागरीं-
पोहती॥५॥ भीष्मअसतांशरपंजरीं॥ तयांलागींधर्मविचारी॥ तेंऐक
तांनरनारी॥ ह्मणतीकरींव्रतऐसें॥६॥ भीमसेनानेंकौरवांसी॥ मारूनके
लेंकुळक्षयासी॥ अर्जुनेंसकळनृपांसी॥ मृत्युमहासंधाडिले॥७॥ इ
तुकेदुर्योधनाचेयोगें॥ घडलेंवाईटबुद्धीच्यासंगें॥ कुळक्षयसर्वांचावेगें
॥केलाबंधुवर्गेंजाणपां॥८॥ पृथ्वीवरीनाहींनृपाळ॥उरलेतेवृद्धकिंवा·
बाळ॥ भारथवंशींपांचकाळ॥ आह्मीसकळराहिलों॥९॥ आह्मापांचां·
स्वेराजकोण॥ भारथवंशीनाहींजाण॥ पुढेंवंशनसेमुळींहुन॥ केलेंनि·
र्दलनद्रोणपुत्रें॥१०॥ झालापुत्रांचासंहार॥ आतांसंततीचाविचार॥ सांव

भीमम्मिळाला राजभार॥ तरीअंतरशांतनोहे ॥११॥ राज्यमलानाहींरुचत॥
मीजरी आहेंजीत॥ लोकमाझीनिंदाकरित॥ असतीजगांतसर्वदा॥ १२॥ मृ
त्यूजरीयेलवलाहीं॥ तरीउत्तमगती होणारनाहीं॥ संततीक्षयजाल्यापांहीं
॥संतापदेहींनिसिदिनी॥ १३॥ येकआमुचीउत्तराजाण॥ तयेउदरींगर्भअ
सून॥ तोहीब्रह्मास्त्रेंकेलादहन॥ अश्वत्थामेंआपणस्वहस्तें ॥१४॥ तेणेंक
रूनिमाझेंअतिशय॥ दुःखेंजळलेंगातहृदय॥ आतांसांगाकांहींउपाय॥ पुसत
रायभीष्मातें॥१५॥ कोठेंजावेंकाय करावें॥ कैसेंसंकट मांझें दुरावे॥ चिरंजी
वीसंततीभावें॥ कैसीपावेसांगेंमज॥ १६॥ उपाय कांहींसांगावा॥ माझेजि-
वींचाविसावा॥ दुःखसागरआटावा॥ पावसीस्वभावाअगस्तीनें॥ १७॥ ऐसें
भीष्में ऐकोनिकानीं॥ सांगेकुंतीसुतालागुनी॥ जेणें होयसमाधानी॥ कीर्ती
जनींराहेल॥१८॥ पूर्वींचेंकथानकसांगती॥ जेणेंचिरकाळवाढे संतती॥
ऐसीहृदयीं धरोनिप्रीती॥ ऐकतांचित्तींठसावे॥१९॥ सर्वव्रतामाजी जे-
कांश्रेष्ठ॥ करितांनपावतीकोणीकष्ट॥जयामाजीसकलांचेंअभिष्ट॥ ऐसें
स्पष्टसांगीतलें॥२०॥ सोमवतीच्यादीवशी॥ जावेअश्वत्थमूलासी॥ करावें
विष्णुपूजनासी॥ पावे संततीसीयोगद्या॥२१॥ अष्टशतकराव्याप्रदक्षिणा
॥अष्टशतरत्नेंआदिकरुन॥ करितांहोतीमनोरथपूर्ण॥ सर्वांचेंजाणव्रत-
योगें॥ २२॥ रमावल्लभासीपूजेचांप्रीती॥ हेंव्रतकरावेंउत्तरेहातीं॥ नहोय
गर्भालागींभीती॥ जाणनिश्चितीमृत्यूची॥२३॥ गर्भराहिलाजिवंत॥ त्रि
लोकीं होईलप्रख्यात॥ ऐसेंपितामहसांगत॥ प्रश्नकरीतमागुती॥ २४॥ ध
र्मह्मणे हेंउत्तमव्रत॥ कवणेंआणिलेंमृत्युलोकांत॥ कोणीकेलें हेंमजप्रत॥
विस्तारयुक्तसांगावें॥ २५॥ गांगेयह्मणेसावधऐक॥ पूर्वींचासांगतों कथा
नक॥ कांतीपुरनामेंनगरयेक॥ उत्तम देख कौतेथा॥ २६॥ त्यानगराची शोभा
ऐका॥ जैसीकुबेराचीअलका॥ तैसाप्रकाशसकळिकां॥ देवादिकांभासत
से॥२७॥ गल्लोगल्लीरत्नांच्याज्योती॥ अंधारनिकमात्रनपडेक्षिती॥ भासे
जैसीअमरावती॥ चकितहोतीचंद्रसूर्य॥ २८॥ वाड्याशिवाडेभिडले॥ कि
तीएककांचनेंशोभले॥ कोणीपंचधातुचेंबनविले॥ विटेबंधीबांधिलेअ-

मूप॥ २९॥ राजमहालगगनचुंबित॥ कामज याचें रत्नजडित॥ चित्रें रवणोरव
णीं शोभत॥ मंत्र कगात हरिगुण ॥ ३०॥ रत्नाचा प्रकाश परिपूर्ण॥ नसे दीपाचें
कारण॥ उदय नपावे चंडकीर्ण॥ व्यवहार संपूर्ण चालविती॥ ३१॥ तेथें नसे·
दिननिशी॥ सर्वलोक संतोष मानसीं॥ वेदघोष अहर्निशी॥ व्यवहारादूजां
सीयेवदाची॥ ३२॥ कोणी करिती शास्त्र पठण॥ कोणी याज्ञिक होम हवन॥
कोणी पुराण कोणी कीर्तन॥ सर्वकाळ लीन हरिपायीं॥ ३३॥ पंचमहायज्ञ अ·
खंड॥ यज्ञयाग करिती प्रचंड॥ गोब्राह्मणा नसे दंड॥ अधर्म बंड नसे तेथें॥
३४॥ ब्राह्मण संतर्पण सतत॥ धर्मनीतीनें राज्य करित॥ गीत नृत्य रंभा करित
॥ इंद्रभुवनाऩ तयापरी॥ ३५॥ नानापरीचे वृक्ष सुरेख॥ बागबगीचे अमो·
लिक॥ रावे मैना कोकिळादेख॥ बोलती सुरेख सुस्वरें॥ ३६॥ फणस अंबा
जांभुळ॥ कर्दळी नारळी सीताफळ॥ जांब अंजीर पांकळा॥ अनार रामफळें
नारिंगें॥ ३७॥ बदाम जायफळ लवंग झाड॥ सुरु सुरंगी केवडा ताड॥ जा
गोजागउसाचे फड॥ खारीक माड लागले॥ ३८॥ जाई जुई आणि सेवती॥
बटमोगरा चमेली शोभती॥ गुलाब केतकी बकुळ किती॥ नाना जाती पुष्पां
च्या॥ ३९॥ द्राक्षांचे मंडप सुशोभित॥ मध्यभागीं कारंजी उडत॥ तडाग
कुवे अपरमित॥ पाटवहात उदकाचे॥ ४०॥ फळें पुष्पें करूनि युक्त॥ वृक्ष·
रहाती सदांदित॥ पशुपक्षी पाळिले बहुत॥ नाहीं गणीत तयासीं॥ ४१॥
दरिद्र दुःख कोणाप्रती॥ नसे ठावी यम भीती॥ जैसी अग्नीची तेजोवृत्ती॥
तैसी शोभत नगरी हे॥ ४२॥ तया नगरीमाजी जाण॥ राजा राहे रत्नसेन
॥ महापराक्रमी दारुण॥ न्यायनिपुण राज्य करी॥ ४३॥ आपण चाले धर्म
नीती॥ तैसा चालवी लोकां प्रती॥ अखंड हरिहराची भक्ती॥ पावता मुक्तीस
कळिक॥ ४४॥ तेथें येक असे ब्राह्मण॥ तया देवस्वामी नाम जाण॥ शु
क्लवृत्ती करूनि आपण॥ धर्मपरायण राहातसे॥ ४५॥ तया ब्राह्मणाची
स्त्री महासती॥ नाम तियेचें धनवती॥ जिची त्रिभुवनीं असे कीर्ती॥ नाहीं·
जगतीं दुजी ऐसी॥ ४६॥ भासे प्रती लक्ष्मी देखा॥ तियेसी सात पुत्र ऐका
॥ येक जाली कन्यका॥ तेजें देखा चंद्रबिंबा॥ ४७॥ नाम तियेचें गुणवती॥

मातेचीअसेबहुप्रीती ॥ कन्यकाग्रहींपेकूलती ॥ ममताचित्तींसर्वांच्या ॥ ४८
सकळपुत्रांलागुन ॥ कन्याकूळशीळपाहुन ॥ विवाहकरूनीब्राह्मण ॥ कुमारिकाजाणकन्यका ॥ ४९ ॥ ब्राह्मणजातांभीक्षेसीं ॥ अतीतआलाद्वारापाशीं ॥ अग्नीसारिखातेजोराशी ॥ पाहुनीतयांसींसकळिकें ॥ ५० ॥ भासेजेसाचंडकीर्ण ॥ ऐसाकधींनआलाब्राह्मण ॥ पहातांउल्हासलेंमन ॥ महातपोधनतोचीएक ॥ ५१ ॥ ह्मणतीकायआलारमापती ॥ किंवाधाडितीजाळीपार्वती ॥ आमुचेंसत्वपहावेंचित्तीं ॥ ह्मणोनियेतीशंकर ॥ ५२ ॥ स्नुषाएकापाठीएक ॥ भीक्षाघालितीसकळिक ॥ आशीर्वादें संतोषप्रुरव ॥ आल्यादेखग्रहामाजी ॥ ५३ ॥ चिरकाळसौभाग्यप्राप्ती ॥ तुमचीवाढेलसंतती ॥ होईलसकळांउत्तमगती ॥ ऐसेह्मणतीद्विजराज ॥ ५४ ॥ ऐकतां अतीतभाषण ॥ माताह्मणेगुणवतीलागुन ॥ तूंहीभीक्षाघालींनेउन ॥ ऐकतांमनसंतोषे ॥ ५५ ॥ कुमारिकाभीक्षाघालित ॥ अतीतानमनकरीत ॥ तोंआशिर्वादकायबोलत ॥ धर्मवतीह्मणनतूंचिहोसी ॥ ५६ ॥ ऐसेंऐकतांकन्येनेंकानी ॥ सांगेमातेसींजाउनी ॥ तुझियापुत्रस्त्रियांलागुनी ॥ सौभाग्यवतीह्मणोनीबोलिला ॥ ५७ ॥ मजलागींह्मणेधर्मवती ॥ ह्मणोनिदुःखउपजेचित्तीं ॥ मातेनें ऐकतांनेत्रपातीं ॥ लाउनीचित्तीस्थिरावली ॥ ५८ ॥ थोडावेळस्वस्थराहुन ॥ मगकन्येसींहातींधरुन ॥ पुन्हाभीक्षाब्राह्मणालागुन ॥ घालवीआपणसमक्ष ॥ ५९ ॥ नमनकेलेंब्राह्मणासी ॥ धर्मवतीहोह्मणेतियेसी ॥ ऐसेंऐकतांमातेसी ॥ खेदमानसींवाटला ॥ ६० ॥ धनवतीनेंऐसेंऐकून ॥ विचारित्येअतीतालागुन ॥ सांगामजलाहेभगवान ॥ कायह्मणूनऐसेंबोलिलां ॥ ६१ ॥ माझ्यास्नुनानीनमस्कारकेला ॥ त्यांलाअविधव्यऐसेंबोलिला ॥ स्रग्वकारकसंपत्तीसकळा ॥ कन्येलादीधलाविपरीत ॥ ६२ ॥ यांतीलकायकारण ॥ तेमजकराजीनिरोपण ॥ ऐसेंऐकतांब्राह्मण ॥ बोलेवचनपरियेसा ॥ ६३ ॥ मजअंतरींप्रतरणानसे ॥ अवघेंमजलासमभासे ॥ परीजिलाजैसायोग्यअसे ॥ तैसादेतसेंआशिर्वाद ॥ ६४ ॥ हीधर्मवतीकेंसीहोय ॥ इच्छाप्राप्तीआहेकाय ॥ सांगामजलाद्विजराय ॥ ह्मणोनिपायधरियेले ॥ ६५ ॥

तूंअससीत्रिकाल ज्ञानी॥ सकळ ठावें तुज लागुनी॥ ह्मणोनि विचारीं प्रश्न स्वमनीं॥ नको घोरुनी ठेऊं आतां॥ ६६॥ इचें लग्न जेव्हां होईल॥ तेव्हां विघ्न संचरेल॥ काळपाश येउनी टाकील॥ घेऊनि जाईल पतीतें॥ ६७॥ सप्तपदीच्या आंत जाण॥ होईल भ्रतारप्राणहरण॥ ह्मणोनि आशीर्वादभाषण॥ धर्मवती ह्मणून केलें असे॥ ६८॥ मग ब्राह्मणस्त्री अभुदाक्रित॥ अतीताला गीं उपाय पुसत॥ कांहीं मला सांगजी त्वरित॥ दृढ धरीत चरणातें॥ ६९॥ मग बोले तपोधन॥ यत्न असे तयाला गुन॥ कवण्या प्रकारें तो करी श्रवण॥ वैधव्य जाण नयेची॥ ७०॥ कोणी येक स्त्री सदय॥ अति कोमल जिचें हृदय॥ सोमा नामें देईल अभय॥ मग न से भय काळाचें॥ ७१॥ तयां आणोनी सदनांत॥ पूजन करावें प्रेमयुक्त॥ तरी सौभाग्य राहेल सतत॥ पावेल चित्त समाधान॥ ७२॥ धनवती विचारीत या॥ सोमा राहे कोणत्या ठाया॥ कोण जाती असे तया॥ सांगें विप्रराया मज आधी॥ ७३॥ आतां न लावीं उशीर॥ सांगा मजला झडकर॥ तयाचा उपाय सत्वर॥ करणें निर्धार आह्मासी॥ ७४॥ ऐकोनि बोले द्विजोत्तम॥ सोमा जाती रजकीण उत्तम॥ सिंहल द्वीपामाजी जीचें धाम॥ परम उत्तम सती ती॥ ७५॥ तयेसी आणावी त्वरा करून॥ मग करावा विवाह संपादन॥ ऐसें अतीतें सांगुन॥ गेला आपण निघोनी॥ ७६॥ तया उपरी धनवती जाणा॥ पाचारी सत्पुत्रालागुन॥ तयां सांगे सर्व वर्तमान॥ अतिथीं संपूर्ण वदला तें॥ ७७॥ पुसों लागली तयां प्रती॥ भगिनीस वैधव्य तुमच्या चित्तीं॥ नसावें तरी माझी वचनोक्ती॥ ऐकोनि त्वरित गतीं तुह्मीं जावें॥ ७८॥ सिंहल द्वीपामाजी जाउन॥ आणावें सोमे लागुन॥ नयेचें करीतां पूजन॥ वैधव्यनाशन होतसे॥ ७९॥ मायबापावरी निष्ठा असे॥ तयावचन पाळावें हें मनि वसे॥ तोची आणिल ऐसें मज भासे॥ पुत्र परिसें तो चि माझा॥ ८०॥ ऐसें मातेचें ऐकूनि वचन॥ पुत्र ह्मणती तयेलागुन॥ प्रीती आमुची भगिनीवरी जाण॥ कल्याण परिपूर्ण इच्छीतसों॥ ८१॥ परंतु आह्मीं काय गे करावें॥ शत योजन सागर केसें जावें॥ तया पैलतीरा द्वीपस मजावें॥ केसें उल्लंघावें सिंधूतें॥ ८२॥ आमुचें तयेस्थानीं जाणें॥ कवणाच्या हातून नाहीं होणें॥ हें मातें मनीं समजणें॥ न लगे विचरणे अगाधु॥ ८३॥ मायपुत्राचीं भाषणें होत॥ इ

तुकीयामाजीग्रहींयेत॥ देवस्वामीअकस्मात॥जाहलेंमृतपुत्रबोलत॥८४
ऐकतांकुमरांचें भाषण॥ देहसंतप्तजाहलाजाण॥ मजलासमपुत्रअसून
॥शोकदारुणकरिसीतूं॥८५॥आजीमींअसेंनिपुत्रिक॥ तूंतिळमात्रनक
रींशोक॥ सिंहलद्वीपींचामींपाहतोंलोक॥आणितोंदेखसोमेतें॥८६॥ऐ
सेंसक्रोधबोलतांवचन॥ तेंपित्याचेंकृतानीऐकोन॥ कनिष्ठपुत्रस्वयेंआपण
शिवस्वामीजाणऊठला॥८७॥मगबोलेबापालागुन॥ मीजीनअसतांजाण
॥ऐसेंबोलतांकांकोपोन॥ संतोषमनराखावें॥८८॥ऐसेंवदोनीमायबापा
तें॥ नमनकरूनीतयांनें॥ भगिनीसीघेउनीसांगातें॥ सिंहलद्वीपातेंनिघा
ला॥८९॥ कांहींदिवसपंथक्रमित॥ उभयतांसिंधूतीराप्रतीयेत॥ तीर्थराज
पाहुनींभयाभीत॥जालेंचित्ततयाचें॥९०॥ चारलक्षयोजनेजलपुरीत॥
भरलेंअसेअपरमित॥ पैलतीरकैसेंहोयप्राप्त॥ ईश्वरसंकेतकवणजाणे॥
९१॥ ईश्वराचीलीलाअगाध॥ कवणालागेतयाचाशोध॥ कैसेंआहेआपु-
लेंप्रारब्ध॥ कोणकृबुद्धसांगेआह्मा॥९२॥ परमचिंतेनेंव्यापिलेंमन॥ अ
श्रूढाळितीदिनवदन॥ नाहींउतरावयासींसदन॥ जवळीभक्षणकांहीनसे
॥९३॥ ऐसासमयजाहलाप्राप्त॥ कोणीनसेसोयराआप्त॥ क्षुधेनेंशरीर
जाहलेंतप्त॥विश्वंभरगुप्तयासमया॥९४॥ महाभयानकसागर॥ कोण-
करीलपैलपार॥ ऐसावारंवारविचार॥ चिंतामगरीसोडीना॥९५॥ तेथेंवटवृक्ष-
देखिला॥ तयाछायेसीउतरला॥ भगिनीसीह्मणेउपायमजला॥ नसूचेजाया
लापैलतीरा॥९६॥आजघडलाआह्मांउपवास॥ नमिळेयेथेंभक्षावयास॥प
रमेष्ठीनेंलिहिलेंप्राक्तनास॥ करितांसायासमिळेचिना॥९७॥ऐसेंजेंकांबो-
लतीसकळ॥गृध्रपक्ष्यांचेऐकतीबाळ॥ अंतरींलागलीबहुतळमळ॥ पडलीं
विकळपक्षीपिलें॥९८॥ वटवृक्षावरीकंटकाचें॥ग्रहहोतेंगृध्रपक्षाचें॥ मा
यबापेंगेलीबाळकांचे॥उदरभरणाचेंआणावया॥९९॥ अस्तमानहोतांजा
ण॥ गृध्रआलाचाराघेउन॥ शिशूमुखेंघालीआपण॥नकरितीभक्षण बा-
ळकें॥१००॥ तेव्हांतोपक्षीचिंतातुर॥ मनींजाहलाअनिवार॥ पुत्रांसीह्मणे
येवढानिर्धार॥ केलाअनिवारकासया॥१॥ चाऱ्यासिंजालाउशीर॥ ह्मणो

निरागआलाकारा। किंवाकायसंकटतुह्मावर॥ नेणेयारमींकांहीं॥२॥ प्रातः कालपासूनउपवास। ह्मणोनिआणिलेंकोमलमांस॥ मुखींघालितांनख्या ग्रास॥ सांगेकारणासकायतें॥३॥ तेंऐकोनीबालेंबोलती॥ वृक्षाखालींमा नवअसती॥ अन्ननमिळेतयांप्रती॥ उपोषितअसती चारप्रहर॥४॥ तयां राकुनीआपण॥ कैसेंकरावेंमांसभक्षण॥ ऐसेंऐकतांवचन॥ कळवळेमन गृध्राचें॥१०५॥ करुणाजालीउसन्न॥ गृध्रतयांपासींयेवोन॥ ब्राह्मणासि ह्मणेकायकारणं॥ जालेंआगमनयेथवरी॥६॥ तुमचेंकार्यकायआहे॥ तें मींकरीनलवलाहें॥ भोजनकरोनीस्वस्थराहें॥ माझेंवचननोहेअसत्य॥७॥ ऐसेंतयाचेंभाषण॥ ऐकतांबोलेब्राह्मण॥ सिंधूच्यापैलतीरालागुन॥ जाणे ह्मणोनपातलों॥८॥ भगिनीच्यावैधव्याचानाश॥ करणेआहेआह्मास॥ ह्मणोनिजाणेसिंहलद्वीपास॥ रजकीसोमासआणावया॥९॥ ऐसेंपरस्प रेंभाषण॥ होतांगृध्रह्मणेतयांलागुन॥ तुह्मींआतांकराभोजन॥ प्रातःकाळीं नेईनमींतुह्मा॥११०॥ नेईनसोमेच्यागृहापती॥ कांहीखेदनकरावाचित्तीं॥ कंदमुळेंआणोनीतयांदेती॥ पक्षीजातीस्वस्थाना॥११॥ मगआपल्याशिशुं स॥ मांसदेतीखावयास॥ भक्षूनीस्वस्थमानस॥ राहतीक्रमणशावक॥ १२॥ प्रातःकालसमयहोतांजाण॥ भगिनीसहविप्रपाठीघेउन॥ गृध्रगगन- पंथलक्षून॥ गेलाघेऊनपरतीरा॥१३॥ सोमेच्यागृहासीनिर्धारीं॥ द्विज- पांचविलातेअवसरीं॥ आपणपरतोनिआलावटावरी॥ पावलाश्रीहरीतयां तें॥१४॥ तयेस्थानींजाऊनिब्राह्मण॥ रजकीगृहानजीकराहुन॥ गुणवती सहआपण॥ सेवाकरूनस्वस्थअसे॥१५॥ प्रतिदिनींप्रातःकाळींउठोन॥ सोमेच्याआंगणाप्रतिजाउन॥ करुनिसडासंमार्जन॥ येतीपरतोनस्वस्था- ना॥१६॥ ऐशाप्रकारेंसेवाकरीत॥ होतीएकसंवत्सरपर्यंत॥ पुढेंपाहिलेंअक स्मात॥ कवणकरीतऐसेंहें॥१७॥ मगपुत्रांसहस्नुषांसीं॥ सोमाबोलावीस वींसी॥ सडासमार्जनआंगणासी॥ घालीरांगोळीसीकोणहें॥१८॥ तेव्हांस कळबोलतीजाण॥ आह्मींकरीतनाहीसडासंमार्जन॥ नदेखोंकरीतेंकोण ॥आश्चर्यमनभरलेंतिचें॥१९॥ सोमालागलीजपणिसीं॥ जाग्रणकरीत-

बैसलीनिशी॥ तोंपाहिलेंगुणवतीसी॥ करितांसमार्जनासीतयेठायीं॥ २०
मगपुसेतयांलागुन॥ तुह्मींआह्मांकोरीलकोण॥ तेव्हांसांगतीलयेलागुन॥
आह्मींब्राह्मणमुलेंअसों॥ २१॥ ऐसेंऐकतांकानीं॥ दुःखजाहलेतयेलागुनी
॥ मींमहापापाचीखाणी॥ कोणनिर्वाणीमजतारी॥ २२॥ मींमहाहीनजाती
ची॥ योनीपावल्येंरजकाची॥ आतांसेवाघेतलीब्राह्मणाची॥ पुढीलजन्माची
गतिकोण॥ २३॥ ऐसीदुःखेंकरूनिविव्हळ॥ लागलीजिवासीतळमळ॥ ह्मणे
ब्राह्मणासींवेळोवेळ॥ दकलिलेंकेवळपापदरीं॥ २४॥ अंतःकर्णजालेंविरक्त
॥ केसीहोईनअघमुक्त॥ कवणतारीलईश्वरभक्त॥ करावीसंगतकवणाची॥
२५॥ तूंउत्तमजातीब्राह्मण॥ मीअत्यंतपापिष्टरजकिण॥ तूं येथें करिसीस
डासमार्जन॥ याचेंकारणसांगेंमज॥ २६॥ मगशिवस्वामीबोलत॥ गुणवतीभ
गिनीच्याप्राप्तनात॥ समपदीमाजीवैधव्यप्राप्त॥ ऐसेंबोलतांहूजोत्तम॥ २७
तूंअसतांतयाजवळी॥ वैधव्यनयेकोणेकाळीं॥ ह्मणोनिगुणवतीवेल्हाळी॥ आ
णिलीझडकरीतुजपाशीं॥ २८॥ दुस्वप्नपडतांजाण॥ करावेंजेसेंविष्णुस्मरण
॥ तेसेंआह्मांतुजलागुन॥ विघ्ननाशनआठऊतुजा॥ २९॥ अनुजेसिवैधव्यन
यावेंह्मणून॥ दास्यलतुझ्याग्रहींकरितोंजाण॥ ऐसेंविप्रवाक्यऐकोन॥ बोलेरज
किणतयांप्रती॥ १३०॥ तुह्मीयेवोनीनीचग्रहासी॥ हेंकाजयोग्यनसेतुह्मासी॥ आ
तांनकरींऐसीयासी॥ येतेंग्रहासीतूंमच्या॥ ३१॥ मगवाड्यामाजीजाउन॥ कारि
त्येस्नुषांलागींभाषण॥ मीविप्राकडेजाउन॥ परतयेईनतोंवरी॥ ३२॥ माझ्यारा
ज्यामाझारी॥ कोणीमृतपावलाजरी॥ तरीतयादहननकरीं॥ अथवानपुरींभू
मीतें॥ ३३॥ तयाचेंअनेकउपायेंकरून॥ तुह्मींकरावेंरक्षण॥ मीब्राह्मणाचें
कार्यकरून॥ येत्येपरतोनलौकरी॥ ३४॥ ऐसेंसांगोनतयांसीं॥ आपणनिघा
लीवेगेंसी॥ विप्रपुत्रकुमारीसी॥ घेउनीसागरासीउल्लंघिलें॥ ३५॥ एकक्षण
मात्रेंकरून॥ आलीकांचनपुरीलागुन॥ तयाधनवतीनेंपाहुन॥ केलेंपूजनसो
मेचें॥ ३६॥ तयाउत्तरावयायोग्यजागा॥ देतीजालीतीस्वभगा॥ कन्येचेंवैधव्य
जाईलभंगा॥ स्नानेंदगंगावाहातसे॥ ३७॥ उबगलीहीकुमारपणासीं॥ वरपा
हुनीआणाइसीं॥ ह्मणोनिमायबापेंशिवासी॥ धाडितीवेगेंसींधुंडावया॥ ३८

देशोदेशाफिरतफिरत॥ अकस्मात आलाउज्जनीत॥ तेथेंदेवशर्माब्राह्मणवस
त॥ तयाचाकुलपाहिला॥ ३९॥ तयारुद्रशर्मानामअसे॥ महागुणवानश्रेष्ठ·
भासे॥ स्वरूपेंप्रतिसूर्यजैसादिसे॥ ऐसानसेदुजाकोणी॥ ४०॥ भगिनीसयो
ग्यवरमिळाला॥ मुहूर्ताचानिश्चयकेला॥ वराघेउनीस्वनगराआला॥ विवाह
तेमिलाउत्तमदिनी॥ ४१॥ देवस्वामीनेकन्येसी॥ पाहूनियांसुमुहूर्तासी॥ दे·
ताजाला रुद्रशर्म्यासी॥ लाविलेंलग्नासी ब्राह्मणे॥ ४२॥ विप्रेंविवाहहोमके
ला॥ सप्तपदीसप्रारंभजाहला॥ तोंरुद्रशर्मामरणपावला॥ आकांतमांडि
लासर्वांही॥ ४३॥ बांधवांसहवर्तमान॥ मातापिताकरितीरुदन॥ सर्वदुःखें
जाहलेदीन॥ ऐसेंपाहुनसोमेनें॥ ४४॥ त्यागुणवतीकन्येजवळ॥ संकल्पपूर्व
कसकळ॥ व्रताचेंअर्पिलेंफळ॥ आयुष्यसबळदीधलें॥ ४५॥ त्यापुण्यउदकें
करून॥ उठलानिद्रिस्तासमान॥ भीष्मसांगेधर्मालागुन॥ ऐकतांसमाधानवा·
टलें॥ ४६॥ दरिद्र्यासिलाधलाचिंतामणी॥ साधूसिआनंदईश्वरभजनी॥ तै
सेमायबापालागुनी॥ सुखसेजेलागुनीपहूडली॥ ४७॥ सोमेनेंविवाहलाविला
तडीस॥ व्रतसांगतलेंब्रह्मपुत्रीस॥ आपणविचारुनीसर्वांस॥ आपुल्यानगरा
सीनिघाली॥ ४७॥ मार्गेंकरूनीसोमाजात॥ इतुक्यामाजीजाहलेंविपरीत॥ पु
त्रतीचेहोतेसात॥ जाहलेमृतसर्वही॥ ४९॥ तदनंतरतिचाभ्रतार॥ मरणपाव·
लानिर्धार॥ जामातहोताधुरंधर॥ येवोनिकिंकरअसूनेनी॥ ५०॥ ऐसेंसोमे·
च्यागृहात॥ पुण्यजातांवर्तलेंअद्भुत॥ तोमार्गांतआलेंसोमवतीव्रत॥ तेथेंक
रीतसोमवती॥ ५१॥ मगनदीतीरालागुन॥ सोमानिघालीकरावयास्नान॥ तों
इतुकियामाजीमार्गीजाण॥ बोलेयेउनवृद्धस्त्री॥ ५२॥ माथांवोझेंजडहो
त॥ उतरावयाकोणीनाहींदिसत॥ म्हणोनिआलीरडत॥ सोमाजातलयेथ
ईं॥ ५३॥ म्हणेमुलीमाझ्यामस्तकावर॥ कापसाचाफारझालाभार॥ येउनी
जैरारवालींउतर॥ ऐकतांउत्तरसोमादे॥ ५४॥ ऐकेंस्त्रियेआजीचादिन॥ अ
मावास्यासोमवारजाण॥ म्हणोनिमींतुजलागुन॥ नशिवेंआपणसर्वथा॥
५५॥ ऐसेंतियेसींबोलत॥ तोंदुजीस्त्रीआलीअकस्मात॥ बोजामाथांजड·
होत॥ म्हणऊनिसांगतसोमेसी॥ ५६॥ मुळाचाभाराउतरसीजरी॥ तरीतुप·

कारहोईलमजवरी॥ मीतयातेंस्पर्शनकरीं॥ सांगोनिनदीतीरींपातली॥ ५७
मगकरूनीस्नानासी॥ आलीअश्वत्थमुळापासी॥ षोडशोपचारेंशिवासी॥
पूजूनिप्रदक्षिणेसीलागली॥ ५८॥ वाळवेंचेअष्टशत॥ खडेघेतलेहस्तांत॥
प्रदक्षणेसयेकवाहत॥ केल्याअष्टशतऐशारिती॥ ५९॥ फळपुष्पउदकेंक·
रून॥ व्रतसमाप्तकेलेंजाण॥ मगनिघालीतेथुन॥ पातलीजाणस्वगृहा॥ ६०
तोंअनर्थमांडलागृहीं॥पुत्रयेकहीजीतनाहीं॥ पतिमुकलाप्राणासही॥गेला
जांवईपरलोका॥ ६१॥उदयहोतांचंडकीर्ण॥ तमजायनिरसोन॥ तैसेंसोमेचें
होतांदर्शन॥ येनीप्राणकलेवरीं॥ ६२॥ दरिद्रेंप्राणीपीडितां॥ यक्षरायकिल्ली
येतहाता॥ मगजोकांआनंदचित्ता॥ नयेवर्णितांअगाधु॥ ६३॥ तैसेंजालेंस
र्वांसी॥दुःखनराहेमानसीं॥ पारनसेचीसुखासी॥ सौभाग्यवृन्हीसीपाव·
ले॥ ६४॥गृहामाजीजेजालेमृत॥ तेउठलेअकस्मात॥ स्नुषांलागींविस्मय
होत॥ वाटेअद्भुतसकळिकां॥ ६५॥ नगरामाजीजेजेजन॥ काळेंनेलेप्राणह
रून॥ तेहीनिद्रिस्तासमान॥उठलेजाणसकळिक॥ ६६॥ ऐसेआनंदाचेपर्वका
ळीं॥ सकळपोंहतीसुखसागरीं॥उठलीदुःखाचीलहरी॥ गेलीएकसरीवि
रोनियां॥ ६७॥ सप्तपुत्रस्त्रियाउठोन॥ जीसासुमानेसमान॥ जिणेंअसादि
धलेदान॥ पतीलागुनआपुलीया॥ ६८॥ तीच्याचरणींठेऊनिशिर॥ ह्मणती
कैसाजालाविचार॥ नेणोंआह्मींपामर॥ सांगासाचारवर्तलेंतें॥ ६९॥ हेसर्वत्र
असतांमृत॥ आतांकैसेजालेजित॥ ऐसेंसतीसींपूसत॥ सोमा बोलतऐ·
कातें॥ ७०॥ हेमृतहोण्याचेंकारण॥ मजपासीहोतेंव्रतपुण्य॥ तेंब्रह्मकन्यके
केलें अर्पण॥ तेव्हांऐसेंजाणविघ्नआलें। ७१॥ तेथूनिनीघतांत्वरित॥ मार्गीं
आलेंसोमवतीव्रत॥ तेंसांगकरितांउठत॥ अकस्मातसर्वही॥ ७२॥ स्वप्ना
माजीभयानक॥ व्याघ्रसिंहादीदेतीदुःख॥जागृतीपहातांनष्टसकळिक॥
आपणयेकउरेची॥ ७३॥ तैसायाव्रतेंकरूनी॥ स्वभवतमृत्युभासलामनी
॥ आणितयाव्रताच्यादिनीं॥ नेमनिष्ठेनेंचालिल्यें॥ ७४॥ स्पर्शल्येंनाहींतुळ
सीं॥ तयापरीजाणमुळासी॥ गेल्येअश्वत्थापाशी॥ आराधिलाविष्णुसी·
मनोभावें॥ १७५॥ जोकांलक्ष्मीचापती॥ मूर्तीतयाचीआणोनिचित्तीं॥ ११

रवचक्रगदापद्महातीं॥ पूजिलाभक्तीमानसीं॥ ७६॥ शामसुंदरअतिकोम-
ळ॥ अपादमस्तकींवैजयंती माळ॥ भृगुलांछनेंशोभलेंवक्षस्थळ॥ कौस्तुभ-
विशाळगळ्यामाजी॥ ७७॥ ऐसेंअपादमस्तकरूनिध्यान॥ मगकेलेंलौकि-
कीपूजन॥ अश्वत्थमुळींविष्णुस्मरोन॥ षोडशोपचारें पूजनकेलें॥ ७८॥ अ
ष्टशतवाकूंचेखडे हातीं॥ घेउनीघातलेसोमवती॥ एकशतअष्टप्रदक्षिणावि
त्तीं॥ नसोडीश्रीपतीकदापी॥ ७९॥ विष्णुपूजनजेकरिती॥ तेपावनभिजग-
ती॥ ऐसेंसाधुसंतजनबोलती॥ तयाचीप्रतीतीमजआली॥ ८०॥ तयावैकुं
ठींहोयवास॥ यमदूतनशिवेतयास॥ पन्नगेंपाहतां गरुडास॥ भीतमानसका
ळतैसा॥ ८१॥ ऐसेंपुण्यकारकव्रत॥ ह्मणोनिसमस्तजालेजीत॥ हेंतुह्मींक
रीतांपुनीत॥ व्हालनिश्चितसर्वही॥ ८२॥ ऐसेंऐकतांभाषण॥ स्नुषापावती
समाधान॥ मगब्राह्मणातेंबोलाउन॥ व्रतसंपादनत्यांहींकेलें॥ ८३॥ तयार
जकग्रहींजाण॥ व्रतावांचुननाहींकोण॥ पुत्रपौत्रादिसंततीविपुलधन॥ आ
युष्यवर्धनसर्वांसी॥ ८४॥ तयानगरामाझारी॥ वैधव्यनसेकोणीनारी॥ सं
ततीसंपतीसर्वांघरीं॥ पापवैरीवसेचिना॥ ८५॥ ऐसेंव्रतकेलेंधरोनिप्रीती
॥ सर्वगेल्याविष्णुलोकाप्रती॥ भीष्मधर्मातेंसांगती॥ ऐकतांपुसतीमागु-
ती॥ ८६॥ कौंतेयह्मणेगंगात्मजा॥ याचाविधीसांगेंमहाराजा॥ पुरुषकिंवा
स्त्रियांनीपूजा॥ करितांप्रजासुरवावे॥ ८७॥ मगपितामहसांगती॥ सोम
वारयुक्तअमाअसती॥ तयालागींपुण्यकालह्मणती॥ देवादिकांप्रतीदुर्लि
ळ॥ ८८॥ त्यादिनींप्रातःकाळीं॥ उठोनिस्नानाजावेंसकळी॥ तीर्थराजअ-
सतांजवळी॥ दुसऱ्यास्थळींनजावें॥ ८९॥ दूरअसेंजरीसागर॥ तरीन्हावें-
गंगानीर॥ कृष्णावेण्याभीमातीर॥ तीर्थंसुंदरशरपूऐशीं॥ ९०॥ अथवाभा
गीरथीचेंस्नान॥ किंवायमुनातिरींजाउन॥ सरस्वतीक्षिप्राउज्जन॥ गोदा-
स्नांनकरावें॥ तापीनर्मदाचंद्रभागा॥ करवीरींअसेपंचगंगा॥ गोतमीगंगो
त्रीपापभंगा॥ पावनजगाकरितीत्या॥ ९२॥ ऐसींअनेकतीर्थेंअसती॥ जा
णेंनघडेजयांप्रती॥ तेणेंनदीनालेउदकेंवहाती॥ सरोवरेंअसतीन्हावया
॥ ९३॥ परीसीतोदकस्नानास॥ करितांऋद्धीहोयदेहास॥ मगधरोनीमौ

न्यव्रतास ॥ काजळकुंकुमाससेवावें ॥ १४ ॥ उत्तमवस्त्रपरिधान ॥ शालुपीतां- बरआदिकरुन ॥ संपूर्णपूजासामग्रीघेउन ॥ करावें गमनअश्वत्थीं ॥ १५ ॥ म गतयामुळाचेठायीं ॥ विष्णुतेंस्मरोनीत्दृदयीं ॥ ब्राह्मणमुखें पूजासर्वही ॥ तये ठायींकरावी ॥ १६ ॥ षोडशोपचारेंपूजन ॥ लक्ष्मीसहीतनारायण ॥ वस्त्रा- लंकारभूषण ॥ सौभाग्यसंपूर्णअर्पावें ॥ १७ ॥ केशरकस्तुरीचंदन ॥ नानाप रिमळअर्पुन ॥ पुष्पेंसंपूर्णवाहुन ॥ करावें पूजनशुद्धभावें ॥ १८ ॥ जाईजुई मालतीबकुळ ॥ चमेलीमोगराकेवडासोज्वळ ॥ केतकीगुलालकोमळबि ल्वदळ ॥ अर्पासकळनानाजाती ॥ १९ ॥ सुरंगआणिचंपक ॥ पुनागगिर वाळीदेख ॥ कर्दळीकमळसुरेख ॥ पुष्पें अनेकजातीचीं ॥ २०० ॥ तांबूलआ णिदक्षिणा ॥ श्रीफळदेउनीप्रदक्षिणा ॥ मंत्रपुष्पनमस्कारजाणा ॥ करूनि प्रार्थनाविष्णुची ॥ २०१ ॥ ॥ मंत्रः ॥ ॥ व्यक्ताव्यक्तस्वरूपाय स्त्ष्टिस्थि त्यंतकारिणे ॥ आधिमध्यांतहीनायविश्वरः श्रवसेनमः ॥ मूलतोब्रह्मरूपाय म ध्यतोविष्णुरूपिणे ॥ अग्रतःशिवरूपायअश्वत्थायनमोनमः ॥ ॥ इतिमंत्रः ॥ प्रदक्षिणा अष्टदश ॥ द्रव्याचें तितुकेंचीपरमित ॥ सोमवतीसद्यावेंसंमत ॥ व्रतराजबोलतनिश्चयें ॥ २ ॥ हिरेमाणिकमोतींजाण ॥ पाचूपन्हामणीसुवर्ण ॥ पोंवळीरवडेवेंविरोध्यासंपूर्ण ॥ अर्पावेकरूनडागिने ॥ ३ ॥ भांडीयालावीं अष्ट शत ॥ वस्त्रेंयावींसौभाग्ययुक्त ॥ फळफळावळअपरमित ॥ पक्वान्नेंअद्भुतअर्पा वीं ॥ ४ ॥ जेंजेंसोमवतीसीअर्पावें ॥ तेतेंअष्टशतसमजावें ॥ प्रदक्षणाहोतां- वायनद्यावें ॥ पूजनकरावेंविप्रांचें ॥ २०५ ॥ प्रदक्षणाद्रव्यजेंकांअसे ॥ पुरोहि ताबीणअन्याचेंनसे ॥ तयाअर्पुनीसंतोषमानसें ॥ पुढेंकैसेवर्तावें ॥ ६ ॥ सौभा- ग्यद्रव्यें करून ॥ करावेंसुवासिनीपूजन ॥ ब्राह्मणसुवासिनीभोजन ॥ घालुनी समाधानकरावें ॥ ७ ॥ तांबूलदक्षिणादेऊनितयासी ॥ मगआपणबैसावेंभोज नासी ॥ पतिआज्ञेमाजीअहर्निशी ॥ असतांतयासीसुखहोय ॥ ८ ॥ हेंस्त्रियां नीव्रतकरावें ॥ संततीसंपत्तीतेंपावावें ॥ विष्णुपूजनकरितांजिवेंभावें ॥ मुक्तिस्व भावेंभामहोय ॥ ९ ॥ तरीहेंव्रतकरूंआपण ॥ द्रौपदीसुभद्राजाण ॥ सांगेउत्तरेला- गुन ॥ संततीवर्धनहोयतुह्मी ॥ १० ॥ ऐकूनिभीष्माचेंवचन ॥ व्रतसांगीतलेंस्त्रि

यालागुनें॥ प्रश्नकरीतकुंतीनंदन॥ करितांसमाधानपितामह॥ ११॥ जेकांअसू तींदरिद्रीजन॥ नसेजयापासींकांहींधन॥ कांहींकैसेंकरावें पूजन॥ करींनिवेद नमजलागी॥ १२॥ पत्रें पुष्पें करुन पूजितां॥ संतोष होय भगवंता॥ तोकेवळअ नाथाचादाता॥ तारकजगता तोचि असे॥ १३॥ गजेंद्रासी पुष्पें करून॥ मोडवि- लानक्रापासून॥ मुक्तिदेउनीपावन॥ केलाजाणजगन्नियंतें॥ १४॥ द्रौपदीचें भ क्षितांपर्ण॥ मुक्तकेलीदुर्वासापासून॥ कण्याविदुरगृहीं सेउन॥ केलापावनत यासी॥ २१५॥ ऐसाजोकांदीनदयाळ॥ तयापुरेतायफळ॥ यथाशक्तीपूजिवां निर्मळ॥ नकोहळहळ करावया॥ १६॥ जयापासीधनधान्यअसे॥ तोपूजनक रितांतेसें॥ देवासिसमजेपरियेसें॥ कपटमिसें पूजिल्हे॥ १७॥ जयापासीनसे कांही॥ तोजें द्रव्य प्रदक्षिणेसींवाही॥ तेंउत्तममानीसर्वही॥ ऐसापाहींश्रीह- री॥ १८॥ सूतनैमिषारण्यींसांगती॥ शौनकादिकसंतोषती॥ तैसीब्राह्मणमु खेंकथाऐकती॥ तयासुखप्राप्तीहोतसे॥ १९॥ हेंव्रतभीष्मेंसांगीतल्यावरून॥ कुंतीनेंस्त्रियांसींसांगुन॥ करविलें द्रौपदीआदिकरुन॥ जालेंसंतानवंशा माजीं॥ २०॥ जैसाउगवतादीननर्णी॥ प्रकाशेसकळमेदिनी॥ तैसापुत्र उत्तरे- लागुनं॥ तोत्रैलोक्यभुवनींविजयीजो॥ २१॥ नामतयाचेंपरिक्षिती॥ भारत वं- शींउत्पन्नजालाज्योती॥ शोभाआलीसदनाप्रती॥ आनंदचित्तींसर्वांच्या॥ २२॥ भां डारखोलुनीधन॥ धर्मकेला ब्राह्मणालागुन॥ वस्त्रालंकारभूषण॥ संतोषवि लेंमनसर्वांचे॥ २३॥ ऐसें व्रताचें महिमान॥ ऐकतां होतेंपावन॥ करितां संतती संपत्तिहोउन॥ पावतीजनसुखातें॥ २४॥ हेंव्रतज्यास्त्रियाकरिती॥ त्यापा वतीविष्णुलोकाप्रती॥ म्हणोनिकरावें भावभक्ती॥ लाधेलमुक्तीतयासि॥ २२५॥ ऐसीहेकथासुरस॥ भीष्मसांगेधर्मास॥ तीप्राकृतभाषेंसर्वांस॥ कळ नांव्रतासआचरती॥ २६॥ ऐसेंमनींआणोन॥ कथाप्रकटकेलीजाण॥ सक ळजगाचें कल्याण॥ होतीपावनसर्वही॥ २७॥ हेंव्रतराजग्रंथसार॥ अबळांसीं असेआधार॥ संततीसंपत्तीसर्वसुखकर॥ पावतीलतरभवनदी॥ २८॥ ॥

इतिश्रीसोमवतीकथासमाप्त॥ ॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥ ॥ ॥



अथशुकचरित्रप्रारंभः

श्रीगणेशायनमः॥ ॥श्रीशुकयोगींद्रानेंरंभेचागर्वहरिला ॥ ध्रु०॥ गर्भीअ
सतांज्ञानझालें ॥श्रीशुकानेंजीवींधरिलें ॥जन्मजराभयमरणवारिलें ॥ भवभ
यातेंसंहारीलें ॥नपसामर्थ्येंतापहरीले॥ विवेकमंत्रेंमन आवरीलें॥ विषय
पसारेदूरसारिले॥ आशयवेदांतींचेवरिले॥ अशेषजेजेभोगभोगिले॥ शु
कअर्भकागर्भजाचणी॥ द्वादशवर्षेंअतिप्रकर्षें॥ अवयवउदरींआकर्षुनियां
॥निकर्षकरुनीवर्षेंबारा॥ गर्भदरींचाअतिऊबारा॥ क्षुधानळाचातापदुबारा
॥ ॥अधोवदनाक्लेशसदनीं॥जारबंधनींमूत्रआधनीं॥ दाथरविष्ठाविष्टफ
ळासमउकडतहोतों ॥जवराग्नीनेंत्वचाहिकोमळा॥ नाकींतोंडींजंतूबुळबुळ
वळवळताती॥ तळमळहोतांकळमळजिवास ॥पूयपंकींकारागृहवास॥ कु
श्चळदुर्गंधीचावास॥ सर्वरोधिलेश्वासोश्वास॥ सोहंसोहंहानिजध्यास॥ वै
राग्याचाजिविंहव्यास॥ वाहेरपडतांमी अभ्यास॥ करीनसाधनबहुसाया-
स॥ ॥तापहिसाहिनसीतहिसाहिन॥ मनासिघेउनवनासिंजाइन॥ क्षु
धेसिखाइनतृषेसिलाविनआल्यावाटे॥ हरिनामाचेघेउनपेटे॥ उतरुनप
रनदिजाइननेटे॥ ताडिनकर्माचेंहीकचाटे॥ झोडिनवासनेचेकांटे॥उपटि
नअभिमानाचींबेटें॥ उघडिनमीमोक्षाचिंकपाटें॥ ॥ऐसागर्भींध्यासला

गला ॥ मांतेचाजिवबहूभागला ॥ व्यासह्मणे इसरोगलागला ॥ उग्रऔषधी रेचयोजिला ॥ मंत्रप्रयोगेंजाकिनयाला ॥ संबंधीऐसाकोणजन्मला ॥ ऐसें· जाणवितीकृष्णाला ॥ श्रीहरिबोलेत्यागर्भाला ॥ शुकापरीपदवीनाझाला ॥ ह्मणोनिशुकहेंनामत्याला ॥ कर्मकथाकथिताजाला ॥ श्रीशुकयोगींद्रानें· ऐसेंचागर्वहरिला ॥ १ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

॥ १ ॥

पुससीकोणतोमीऐसा ॥ अनादिजोजिवनामेंकेसा ॥ पापपुण्यामिश्रितसरिसा ॥ अगुष्ठासमलहानउलीसा ॥ ॥ तोमीसूक्ष्मस्थूलींभरणें ॥ लक्षचौऱ्यासीभरूनियेणें ॥ दुरोनियेथेंझालेंयेणें ॥ दडीदीधलीपापभयानें ॥ माझीऐका अपूर्वकथनें ॥ ॥ स्वधर्मसोडुनिअधर्मवारे ॥ कुकर्मजीवासगोडवारे ॥ अनर्थ तेथेंकर्मचपाटे ॥ मर्मतयाचेंकर्मफळेमग ॥ क्रिमीहोउनीभ्रमणाचक्रीं ॥ भव दुःखानेंकाळक्रमिला ॥ मीमींह्मणतांमेंदीझालों ॥ चंडीपासींमुंडिखंडिलों ॥ काळचक्रामाजिभरडलों ॥ बुरडहोउनीदुरड्याकेल्या ॥ कोष्टीहोउनिपासोड्याविणिल्या ॥ परस्त्रियेतेंपहातांहष्टी ॥ अंधहोयत्यापापेंकष्टी ॥ विषययोगेंअंगकुष्टी ॥ अन्नदानेंस्वेदहपुष्टी ॥ द्रव्यदानें नित्यतुष्टी ॥ अदत्तयोगेंपात्रेंउष्टीं ॥ चारीश्वानहोउनीविष्टी ॥ भीक्षातांदुळनघालिंमुष्टी ॥ तरीच कीटककोरडेकाष्टी ॥ हरिनामाच्यानकरीगोष्टी ॥ दर्दुरहोउनीआरडेसृष्टी ॥ ब्रह्मकुळीचाआचारभ्रष्टी ॥ तरीचगर्दभभारपृष्टी ॥ अतीतउपासींठेउनि आपुलीकायापोसी ॥ धनिकअसोनीविपत्तिसोसी ॥ पुरुनिठेवणेंऐसादोषी ॥ घुसीहोउनीधसेबिळांत ॥ चीबिडाळकाळामूषक ॥ ह्मणेमींघूकरनामा डुकर ॥ होउनिउकरउकरडाउकरीला ॥ श्रीशुकयोगींद्रानें ॥ ० ॥ ॥

॥ २ ॥

सुंदरकायातीर्थस्नानें ॥ पोटशूळहाभुतद्रोहानें ॥ गजादिवाहनेंरूपाद्रवानें ॥ दुष्टजन्मपेउपद्रवानें ॥ परद्रव्याचेंकरितांहरणें ॥ दरिद्रतापेंतापुनिमरणें ॥ रक्तपीतीचोरितांसोनें ॥ क्षयरोगहाबन्हिक्षयानें ॥ अनेकदुःखें अनृतभाषणें ॥ व्याघ्रादिकजेगळांबंधने ॥ आम्लहोतीऋणामिळोनी ॥ नेत्रझांकुर्दि-

जें पितियाणी ॥ वनीवागुळाअधोवदनी ॥ पंक्तीभेदकेलाज्यानी ॥ ॥ धर्मकृ-
रीतांमोडाकेला ॥ गर्भरवोडा प्राप्त झाला ॥ प्रसूतसमयींआडवाआला ॥ शस्त्रें
छेदुनलुडमाकेला ॥ लक्षचौऱ्यासींबाजार ॥ करिवेजार ॥ बहुजोजारह्जारव-
र्षेकारागार ॥ देहसर्पाचे ॥ गृध्रधूकाचे ॥ स्थावराचेफिरतफिरतमगईशदयनें
॥ कर्मभूमीनरदेहींयेणें स्मरणीलागुन मेरुजैसा ॥ शतायुषीअमोल्यथोडा
जन्मलोंमीं ॥ गर्भीस्मरतांसोहंतोमीं ॥ बाहेरपडतांविसरेंहेंमी ॥ भुलोनिकां
ताग्रहस्तहेमी ॥ देहगेहमायामोहें मामामाभाकाकाकाकी ॥ ताईमाईआईबा
ईवहिनीवहिणीविहिणमेहुणी ॥ इत्यादिकहीकर्मकहाणी ॥ यांनात्यांच्यागुं
डाळ्यानेंगुंडाळुनिबंडाळचिझालों ॥ चांडालचिमीमोहेंयाच्या ॥ आच्यावाच्या
नरस्तुतीच्या ॥ कामकुत्तीच्याअर्जवाच्या ॥ हरिहराच्याभजनावांचुनि श्रीहरि
जन्मोजन्मींम्यांकाळचिक्रमिला ॥ श्रीशककर्यागिंद्रानेंरंभेचागर्वहरु० ॥ ॥ ॥

॥ ३ ॥

भयपापाचेंकांहिंचनधरी ॥ पुराणकीर्तनदेवद्वारीं ॥ तांबूलभक्षण कुष्टशरीरी
॥ वर्मेंकर्मेंनिंदाकरी ॥ टिटवीजन्मत्यापक्ष्याभीतरी ॥ गुरुशिष्यानेंवियाचोरी ॥
होयपिंगळातोनिरधारी ॥ अनुचितप्रतिग्रह ब्राह्मणघेतां ॥ गंडमाळाहोतितत्त्व
ता ॥ परद्रव्याचाअपहारकरितां ॥ परक्षेत्रींच्यागाईवळतां ॥ अल्पआयुषीहोय
तत्त्वता ॥ सत्पुरुषेंभजापीडीतां ॥ व्याघ्रसर्पतेहोतितत्त्वता ॥ गाधुच्छळणीवें
शक्षयता ॥ देवद्वारींचनरुताडिनां ॥ छायामोडितांपांगुळहोउनिजायतत्त्वता
॥ ज्यारकर्मेवेश्याजाणे ॥ स्त्रीपुरुषांचेगुत्त्यश्रवणें ॥ दासींकिंवाकुंटिणहोणें ॥
सेवकासिजोत्रासीपूर्ण ॥ तोचीमोक्ष्याचाहक्क नाण ॥ सेवकहोउनीस्वतमिजा
चणें ॥ श्वानहोउनीबहुहिंडणें ॥ ब्रह्मराक्षसंबहुअभिमानें ॥ देवालयींचंतेल
चोरणें ॥ मार्जारहोउनिगुरगुरकरणें ॥ ब्रासमानापित्यासिदेणें ॥ मर्कटहोउ
निवृक्षाफिरणें ॥ ॥ क्षत्रियह्मणउनियुद्धींपळती ॥ सीमाल्दतीकवननिंदि
ती ॥ सत्पुरुषातेंतुच्छकरिती ॥ सापीजन्मात्र्याआवर्त्ती ॥ सद्गुरुचेंजेंमूल्यप-
हाती ॥ त्याचीहोयदग्धसंपत्ती ॥ मार्गस्थाचींवस्त्रेंचोरी ॥ प्रेनवस्त्रातोअधिका
री ॥ ज्ञानसांगुनआचारनकरी ॥ पुनरसहोयतोपृथ्वीवरी ॥ दासीस्वामीसेवान

करी॥ मगरीजन्मत्याजळामीतरी॥ ॥ कन्याविक्रई कसई झाला॥ रसविक्र ईतोमद्यपीकेला॥ बहुतांचा अपमानीत्याला॥ यमदंडितो पह्याजयाला॥ श्राद्धीजेउनिस्त्रीसींभोगिती॥ म्लेंछयोनींजन्मपावती॥ वेदशास्त्रउगेनिंदिती॥ महापुरुषांसींद्वेषकरिती॥ बंधूबधूवैरीकारिती॥ मच्छ होउनीजळींविचरती॥ दोघीस्त्रीयाजेकरिनाती॥ एकींचेंजेचित्तराखिती॥ सारमेयाच्याशरीरावरती ॥गोंचिड होउनिविचरताती॥ उदककांडिता मृत्तकोंडजो॥ पृथ्वीपतिनिंदाकरितो॥ उदरीं अग्नी मंदचिहोतो॥ ग्रहणसंधींकरी भोजन॥ पित्तरोगत्याहोय दारुण॥ परदेशींपरबाळेंविकणें॥ वचनींगुंतुन पालटकरणें॥ गलितकुष्टदुर्गंधीमाहणें॥ अपराधेंविण स्त्रीसजाचणें॥ एक आगन्याहोयशून्य॥ ब्राह्मणाचेंअन्नहरणें॥ वंशीशून्यशास्त्रीपढाणें॥ गुरुसंत आणिमातापीता॥ त्यांचीकरितांउपहास्यता॥ वाचाजाउनिहोयदुश्चिता॥ ब्रह्मवृंदात्रासदेतां॥ व्याधीतिडकालागेतत्वतां॥ पुराणश्रवणींकीर्तनाला॥ जाउनिनिजतां अजगर झाला॥ अनिवादीशासनींपातला॥ देवपुजेचाज्याविटआला॥ शिराआरवडुनिमारिहाकाला॥ पुस्तकचोरमुकाचिझाला॥ नमनकरीनाजोसंताला॥ कठोरवचनें त्रासदीधला॥ बहुजन्मींचाबहुजोजार॥ त्रासपावलोंवारंवार॥ तुलंधवेहा मायापूर॥ ॥ ॥ऐसींवाक्येंशुकमुखींचीं॥ ऐकुनसाची॥ श्रवणकरीजगदात्मात्याचीं॥ धरिचित्तींत्यामुक्तिफुकाची॥ अनुभवाची॥ ऐकतांचीतेधवांश्रीहरीहास्य करोनीकायबोलिला॥ श्रीशुकयोगिंद्रानें रंभेचागर्व हरिला॥ ॥ ॥

॥ ४ ॥

पुण्यलतातेफळासिआली॥ कृष्णेंजाभलीअर्साचादळली॥ पापपदरवळातुजहेकळली॥ तरिकांमाताहेशिणवीली॥ निघोनिआतांसोडमाउली॥ स्वरूपसत्तापाहेंआपुली॥ ॥ मनासिबोधुनिवनासिजावें॥ ब्रह्मभावनेजनांसिध्यावें॥ धनासआणिस्त्रीजनासभ्यावें॥ ॥ नातरिमायागुंतुनिवायां॥ फिरविलबायाच्याआडरानें॥ समावांचुनीनिकामरामा॥ भुलविलतुजलादेइलटोला ॥दाविलचोज्यांसींचाझोला॥ कृष्णबोलता शुकनिघाला॥ त्र्यबलायाप्रपंचांतुनीगेलातैसाआलानाहीं॥ पडलापडशत्रूंच्याठाई॥ वासनेलामारुनिपाई

जाळुनिअंगीभस्मचर्चिलें॥ जिवित्वज्यानेंअसेरवर्चिलें॥ आणिद्वारा ब्रह्मअर्चिलें ॥जिवीअर्चिलेप्रबोधहृदयींशिरकविला॥श्रीशुकयोगींद्रानेंरंभेचागर्व०॥ ॥

॥ ५ ॥

हृदयींधरितकरपल्लवग्रंथी॥ प्रेमभरितनदृहृदयग्रंथी॥ विवेकपंथी॥जेणेऐ-सें येणें नघडे जन्म सांकडें॥ द्वयारोकडे॥प्रसूत भूत नूतन अवस्था॥ संकोचरस्ता विस्तारेसमलिहितांदस्ता॥ कागद नपुरेपुरेहे अस्था॥ ऐसी शास्त्राशुकासघड ली॥ धास्तारवाउन द्वैपायनकृतपयपानानें॥ अव्हेरुनियांघोर वनातें॥ निघेजन्म तांततक्षणातें॥ दर्शितज्याचे ज्ञान दशाजगमृषाभासे मृगदृश्यभ्रमविषासतेव्हां ॥व्यासमनीहव्यासउठीला॥श्वाससांडिला॥ अशाअशाबाळासिपाहावें॥ का सघालुनीपृष्ठीधावला॥ वियोगदुःखेंहोटसुकेला॥ शुकशुकऐसी हाकमारि ली॥ शुकाडोळियापुरवदाखवी॥ अरेपुत्रा क्षणमात्रउभारे मोहेंकळवळयेनि उबारे॥ नेत्रींचंचळअश्रूधारे॥ स्मश्रूअधरावरोनिढळती॥ आकळितानाकळेचि ममता॥ चक्षूपूसितांपक्षिशुकाचा॥ वृक्षआणितृणपक्षिबोलती॥ ओंशब्द जोकांप्रणवाचामहावाक्याचा॥ ध्याताध्यानध्येयधारणा॥ जनींवनींज्ञानांमृ तवृष्टी॥ स्रृष्टिसिंचुनीशीतळकेली॥ निवांतकेली हे ताततातचित्तात॥आणि विख्यातमानहसर्वांतरिंनिरंतर असतां॥ अंतरमानुनि अभ्यंतरकाजाळुनिघेसी ॥ आलोनाभींगेलोंकोठे॥जन्मलोंनामेलोंनसतां॥ भ्रांतीदुःखेंश्रांतहोउनी॥-शांतपणेसिद्धांतविवरुनी॥ असेंपहावें॥ आवरणशक्तीपंचमहाभूतांचीव्यक्ती ॥उपरीठाकतांबंधमुक्तिचाशब्दसूटला॥ स्वानुभवाचा मोडखुंटला॥अविद्या भ्रमजिवासिघडला॥ अहंब्रह्मविश्वासउडाला॥ भावबुडाला॥ मोहोजळा चाआलापूर॥ आत्मासन्निधअसतांदूर॥ देहभ्रांतिचानेत्रींधूर॥ हुरहुरजिवा सद्गुरुज्ञानाचें॥ अंजन नसतां कानकोडा॥ प्रपंच कोडा फोलकाढुनी॥ अभिमा नाचाधिंडाबांधुनिभरलों दाजो त्यांतचबुडती॥ नैसीनकरीआयुष्याची थोडीं अवघीअधीचसावधसाहावधुनीयांसावध व्हावें॥ सत्यसनातन असेंपहावें ॥ घटींघटाकृतिमठीमठाकृति अकाशविकृतिनसतांभासे॥ प्रतिविकारीनसा आत्मा॥ पिंडिंचातो ब्रह्मांडीचा॥ परमात्माजोउपनावपावला॥ अहंतत्वतेंसो

त्वंअसतां ॥ कोहंविभ्रमयोगें विसरे वेदीजें वंदिजे ब्रह्मनें ॥ निरामय असे अंत
मविलसे ॥ नित्यनिर्गुणसत्यसनातन ॥ ज्ञानाअनंतध्यानातीतजें ॥ सजलनदींत
चंद्रजैसा ॥ दिसेउदितसासत्याधारें तैसें तेयाविश्वघरांत वसे समानगुरुज्ञमान
श्रुतिप्रमाणऐसें ॥ यावाक्यानें गतागतिआत्म्यालानाहीं ॥ देहजोथिंचातेथें पा-
हीं ॥ पंचभूतांचापंचभूतीं असतां रवंतिकां बाहे करिसी ॥ भांबाउनियांवियोग
दुःखेंवियोग ह्मणसी ॥ देहाभिमानें मीतूंसरवयापंचभूतांच्यासंगेंजीवहा ॥
वासनेचाअंगसंगघेउन रंगुनिजन्मुनिमरणें आणिजननीचेंजठरीं भरणें ॥ क
र्मकरणें तेंनिस्तरणें ॥ भवह्मातरणें नघडेजाणा ॥ गुरुशरणाविण प्रपंचघा
णा ॥ त्यासिंजुंपिलाजिवहाजाणा ॥ मोहें अंधपशुवत द्वंद्वग्रामिंचि देह झो
पडी ॥ मध्यें मीतूंहे चिझांपडी ॥ नेत्रबांधुनी फिरति बापुडीं ॥ काळहि निष्ठु
र ह्मणीथापडी ॥ नकळे मी हा कोणकेंचा ॥ आलों कोठुनि जाणें कोठें मार्गदीर्घ
तोक्रमुनी भ्रमुनी सेवनकरुनी नानायोनी ॥ मातामाझी मीमातेचा पिताच-
झालों तीचेपूढें मग कांताहोउनी कांततिचा मी अंतपावलों ॥ अकांनकरिती
प्रियापुत्रमग क्रिया आचरती ॥ श्रद्धायुक्तश्राद्धें करिती ॥ निर्मोहत्वें परतपरत
तूं ऐसें ह्मणतां शुक　रानें ॥ मधुरगिरानें क्षीरनिराचानिवाडकरितां अज्ञा
नाचें ॥ कवाडव्यासें उघडुनिअंतरीं विवरिनतत्वें विवरुनियां आत्मत्वेसी मु-
ख्यपदीं निजसख्याकराया ॥ भागवताख्यपुराणपत्रें ॥ व्यासपवित्रें करिलें
धरितां भिंतीचित्रें विश्वमृषा हे विचित्रें हरिचीलीलादर्शित आलीप्रचीत-
महामुनिला ॥ श्रीशुकयोगींद्रानें रंभेचागर्वहरिला ॥　　॥　　॥

॥ ६ ॥

पापभयवैराग्यजयाला ॥ वसनाविणशुकवनासिंगेला ॥ असनत्यजुनियां
खायभुकेला ॥ योगासनाला घालुनबसला ॥ नमनकरुनी गुरुकृष्णाला ॥
उन्मनीचातोमार्गशोधिला ॥ कामक्रोधसमुदाय शोधिला ॥ तत्वमसिमहा
वाक्यबोधिला ॥ नित्यब्रह्मनिर्वाणलाधिला ॥ स्वानंदामृतघटघटप्याला
॥ आनंदाचाढेंकरदिधला ॥ आत्मासेउनिस्वस्थबैसला ॥ संतोषाचाबाग
लाविला ॥ दुःखावलें मगनष्टआशेला ॥ शालदुशाला कशासत्याला ॥ तो-

डुनटाकीमोहपाशाला॥ कायनियमयमकरिलअशाला॥ अशांसयेथेंकशा
सआणितां॥ त्यासिमसाला करालकोम्ही झणीकसाला॥ बोले कृतांतआ
त्मदुताला॥ जिताचिमेला॥ निकामझाला॥ जीवन्मुक्तशुक ह्मणतीत्याला
॥ बहुदेणेमगनलगेज्याला॥ असोविचारात्याचंविचारा॥ येइलतैसेंबरेंह्म
णावें॥उगेंपहावें॥ इंद्रस्वभावें ॥ अभावत्याच्यामनांतयेउनिप्रेरिलें त्याणेंरं
भासुंदरिला ॥ श्रीशुकयोगींद्रानेंरंभेचागर्वहरिला॥ ॥ ॥

॥ ७ ॥

अनुष्ठानतपकाळखोटल्या ॥ तपतेंजेंदशादिशादाटल्या ॥ पुण्यनद्याशुकाच्या
आटल्या ॥ सुकृतवृक्षजरीशुकभेटल्या ॥ ऋणानुबंधेंगांठीसुटल्या ॥ इंद्रम
नीकल्पनाचीउठल्या ॥ तेव्हांत्याच्याशक्तीरखुंटल्या ॥ युक्तीफुटल्यावृत्तीवि·
टल्या ॥ जैसेंश्वानवमनासाठीं ॥ मागेंस्थाच्यालागेंपाठीं ॥ स्वभावदुःखेंहोउ
निकष्टी ॥ तेसंतेणेदेवेंद्रानें ॥ [illegible] सिरंभाआणि·
मेनिकातिलोत्तमादिकसुरगजगामिनी ॥ [illegible] ॥ म्लान·
वदनें॥ पुण्यामृतशुकाचेंहरुनिदोहनकरणें॥ [illegible] पतु
रशाहाणी॥ अवनीभुवनीवनीशुकाच्यापरामृषातेंजावें ह्मणउनिअनिह
र्षानेंशतयज्ञाचीआज्ञावंदुनि॥ करिभानिज्ञाउभीराहुनीशक्रसभेसी ॥
वक्रपाहुनीहांसुनिबोले देइनझोलें॥ भलेंभलेंम्यांचेववीलें ॥ पंचविषय-
म्यांसेववीले ॥ धांउनिआमुचेसुरवरराघ्याले ॥ तपक्षयातेंसर्वचिभ्याले॥ -
आणिकधांवलेवनीपावले॥ तपेंतापलेनेत्रलावीले॥ झालेगेलेंबरेंविसर
ले॥ तपोधनातेंसधनहिझाले ॥ आसनतुमचेंथरारिलेमग आह्मांप्रेरिलें॥
तेथेंजाउनिगाउनिनाचुनिपुण्यदुधातेंदोहुनघेउन मोहुनियंत्रेंविश्वामि·
त्रादिकसत्पात्रेंवातांबु आणिगळींतपत्रें ॥ भक्षुनितपतीआमुच्यासूत्रें॥
वेधवक्त्रेमूत्रेंकुत्रेंजैसेंतैसेंपाठिलागुनीयांक्षणमात्रें ॥ तपेंबाळलींजीं·
तनूगात्रें॥ ॥ त्यालासुंगीयेउनियांमगलुंगीसुटली ॥ स्मरगुंगीनेंहुंगि
नहुंगितजवळिच आले ॥ नकोनको ह्मणतांगळींचपडले॥ भुजेवेष्टुनित
पाभ्रष्टउनिनिष्ठुरतुमचेसभेसि आणिले॥ तेह्रेरंभा अंबुधिजामीजाणत

सातरिमानितसामजयायाविडादाविनक्रिडाकरीनवेडा॥ सोडिचिंताहरिनपी-
डामो हे वेडामीघालुनरवोडा शकक्रीडाथोडाचिवयाचा ॥ धडामनाशामोडुनि-
त्याचा कडामनाच्यावरुनियांमीसडाचिदडदडधांवतआणिन॥ ऐसें रंभागोडबो
लुनीहोडविडाउचलोनिहस्तकींतिणेदृढधरिला॥ श्रीशकयो०॥ ॥

॥ ८ ॥

इंद्रह्मणंगेचंद्रवदनें। चंद्रहारयेचंन्चलनयने॥ चित्रविचित्रहींचिरेंभूषणें॥ चंदन
चर्चितसुगंधनहाणें॥ हारचमेलीचंपासुमनें॥ चतुरपणेंवेंचुनियुक्तीनें॥ निश्चळ
मुनिमनचंचळकरणें॥ मुखचंद्रानें चंद्रिलाउनी॥ नयनचकोरेंकरीं भिकारें॥ बहु
प्रकारें॥ विकारवारें॥ चित्त तयाचें तपोविन्न हलुजपूनयेणें॥ सहस्रनयनें गोरउ
नियां॥ सौरभजननी॥ हास्यवदनें अवश्यवदनी॥ वश्यकरिनमीनमनकरुनियां
॥शचिपतिलागुनिगमना करितांरातिपनिलागुनि॥ वसंतधंउनिहास्यवदने॥ रद
नद्युतीनेविद्युनलज्जित ललनाच्यान्याउचिताकृतिनें विकृतिपावेविवेक वृत्ति-
शाआनृनी॥ नथापितृतीतानमान संगतीपयोधरर्मीतमंदसुगंधवातसहसु
रवरकिन्नर॥ गंधर्वादिकसर्वांच्या वयगर्वेस्फुरती अवघ्याकुशल्या सकामकामिनी
॥सौदामिनीशादिव्यशरीरी भव्यभूषणें देनिदूषणं प्रभाकराच्याउग्रप्रभेला॥ भो
ळाजनमगलाभलाभला॥ भला मनाला आलाप्रेमा बाला आलिंगन ताला घालु
निभ्यालोंमिथ्यापरीहिताला पडेलघाला क्लेशमाला गळीतपाला ॥पडिलाघा-
लाच्छकूंनिघालासमुदायकश्रमदायकसकळा॥ सकळांचेहीविमानवहनेंसमा
ननक्षत्रांच्यापंक्ती॥ दिशारंगती॥ निशाभंगनी अंगप्रभेनें॥उज्वलतनुवरिसो
ज्वळवस्त्रें मज्जनकरुनीकज्जलकिंचित्चिरांचलातुनिदिमतीहीरे ॥ पाचूचेतेहा
रसुमनाचेभारमस्तकीं॥ गजरेफुलांचेधरिले हस्तकीं सन्मुखसरवयां अर्पणाक
रिते ॥ दर्पणपाहुनिसिंधुजाननमुखइंदुवरितिलकबिंदुसुरंगरेखिला॥ अति
दुःखेंमुनिवृंदभेटला॥ एकशकमुनित्याहीद्विजवरें ॥भाळिंद्विजवरेंबिंघा-
चेत्यानखरेमातुनिविवेकनिकरें धिः कारीलेतेअनुसंधानेंध्यानयोगहाजुना
टचंदन नंदनवनिंचाआनंदानें अंगचर्चित्नें हृदयपींडिकात्यासि अर्चिलें॥ उद्धे
दुनियांअकरुणहृदयांविथरुनिकामेंभरुनिपातले॥ अरुणरंगेकंचुकिताचि

तेधरुनिराहिले ॥ तरुणजनाचीहरूनचित्तें ॥ अशाचपेतीकितिएकजाती ॥ मुनीतापसीऋषीदिगंबर ॥ अमरतेंचिपरिपामरझाले ॥ विप्रादिकबहुक्षि प्राप्तक्षनिप्राप्तीइच्छिती ॥ स्त्रीअधराचीपयोधराचीपिंवळ्याअंगीउत्याकें शर्ता ॥ बुत्याभरजरीधत्यानिर्जरी ॥ नेस्रनिरूरंगभाळींकेशरी ॥ नसत्रास मवेसरनाकीं हातांतगजरेश्रीहरिनामेंप्राण्याभजरे ॥ अंतरिंत्यजरे ॥ अधामो हातेंआशानागिणी ॥ कुरळकेंशित्यासरळवेणिया ॥ मुक्तालंकृतवेणिभगाच्या ॥ तांबुलवदनीसिंहकटीकटिसूत्रेंज्याच्याकवर्णरत्नजडिततेतडित्भासस मपांगभरुनियांद्वादशआंगीसांगअभरणेंमतंगगमनाउतंगकुचशोषतंगजे सा ॥ नंगतेथेंरद्रंगझांपडीआंगाबराबरअनंगाचे दळअबळांचें कविअबळा या बळेंचह्मणतीचपळाएकींबुबळाफिरउनिलोकत्रयहादुबळाकरितीचित्तत्रि नतपसमस्तहरिती ॥ पुढेंप्रेरितीवसंतकामाअनळारिकामासिद्धसामादेउनित्या नेंधाडीधाडिलीपवित्रजेथेंअगण्यपुण्यारण्यशक्राचेबिकरवनींत्यानिकट जाउनीविनोदवाऱ्या उपक्रमआदरिला ॥ श्रीशक्रयोगींद्रानें० ॥ ॥ ॥

॥ ९ ॥

वसंतसंततऋलताप्रसवी ॥ कंदर्पाचीसत्ताबरवी ॥ समीरदर्पेंवेधाकचवी ॥ पुष्पवाटिकारम्यनेरकीयाकमटीकादीर्घकेतकी ॥ मंत्रेंसमानसूत्रेंसाधुनीक ळ्याकुसरीनिबिडदुसरी ॥ शीतळवाईर्धिकसितजाईजुईसेवती ॥ चमेलचं पाबकुलमालती ॥ मांदाराच्यासरळपंगती ॥ कोरांटीतीबहुरंगाची ॥ आरा· टीचीनाहींजाती ॥ फुलेंमोगरेपिवळीजाती ॥ गोकर्णाकृतिएकफुलती ॥ ए कस्रकृतीतुळसीनव्हती ॥ जेसेचेंडूफुललेझेंडू ॥ गेदसेंदरेलोकहेंदरे ॥ का· नीरखोंविती घट्टफुलांचेबट्टमोगरे ॥ हाडपांगरेनिंदकळीचेकळवळितभळभ ळीतफुललें ॥ मल्लीकाच्यादीर्घवलिका काळिकाफुलल्याअपारतेथें ॥ पारि· जातकरवारिजातकरतरंगजेथेंभातभातचेवातत्यांनबहुमातकरीतो ॥ वैन स्पतीचागुणविस्वरीतो ॥ रवडेदुपारींफुलेंदुपारींसरळसुपारीगगनचुंबिती ॥ द्राक्षफळातेंपक्षिभक्षिती ॥ क्षितीबराबरसीतळनीतळपात्रहाती ॥ पा टजळाचेसाटगहनत्या थारदाटतरप्रफुल्लवृक्षीं ॥ फांटनसेपरिवाटमध्यें-

चौहाटबांधिले ॥ रत्नशिळालखलखरवार त्यांचेकिळाफांकती ॥ मधुरशब्दको
किळाकूजती ॥ गुंजारवतीसकळा मध्यें ॥ बकुळाच्यासमकुळाभोंवती ॥ आ
ळिकुळांचे वृंदहिंडती ॥ मंदमारुतेंवृक्षडुल्लती ॥ नागकुळेपरिमळें झुल्लती ॥
शुकशुकातें स्पष्टबोलती ॥ अरिष्टतुज हें आलें ह्मणती ॥ धारिष्टातें हरवूं पा
हती ॥ सुख्यागातीश्रीरागातें ॥ ऐसीविवसीतुजलागिवसीवश्य करायाल
क्षलाविलें ॥ सुदक्षमनितो अक्षकपाटें अक्षई देउनी क्षेमस्वरूपप्रकाशिस्थीतअ
सतां ॥ शमदमसमानत्त्हृदयीं भरिला ॥ श्रीशुकयोगींद्रानें रंभेन। ॥ ॥

॥ १०॥

कुशासनीं क्षेमकुशळसमाध ॥ समभजनीरसचदेउन्माद ॥ नगणीकांहीहर्ष·
विषाद ॥ निर्गुणासीं नित्यविवाद ॥ भोगीअद्वयचिन्मयमुद्रा ॥ सौख्यसमुद्राम
ध्येविषयक्षुद्रासीं त्या ॥ नातळोनियांमनबुद्धीने पेलतीरास ॥ निरासतें मूळमि
रासतिजवरिसिराशिगाडुनिशुकगिरास ॥ भाग्याचातो वैराग्याचा दुर्गावर
ता दुर्गाधिपभर्गासमसाजे ॥ स्वर्गावरुनीस्त्रीवर्गानीं ॥ शुकोपसर्गा मोहख
र्गानें ॥ घेउनित्यावरी विध्वंसाया ॥ ईर्षापोटीं अतिहर्षानें सुंदरशात्यासंगें घे·
उनिबाळाप्रौढामुग्धानारी सुरतीनिरता चतुरचौकसा चौऱ्याशींच्याआसनिबै
सुनि शाहाण्यासुंदर पाहाण्या कोण्ही ॥ लाहानमोठ्यागौरगोमट्या खोट्या
मनिच्याकामीनीत्या ॥ नेमिष्टाचेंचेष्टायामन अचाट दळअबळांचें कैसें ॥ प्रब
·ळमाजलेमाजपट्यानें माजबांधिले ॥ सैन्यसाजिलें ॥ नितंबजेचीमतंगत्यावरि
ध्वजाफरारेतेविआंचळा ॥ वायस्पर्शें हलतीचंचलपाहुनित्याचें ॥ धीरत्वहिचंच
ळकांपे ॥ झळझळितशिरींभांगचांदवा नव्हेचिसांगचित्तहृदयातें दुभंगकरि·
तीभांगजसी ॥ सर्वांगव्यापुनीगाढीमूर्छापाडीधरणी ॥ भ्रुकुटीचापेंताडीतर
मृगनयनबाणसत्राणविवेकें प्राण हरतीवैराग्याच्या ठाणावरतीउठावणीहे क
ठिणकुचाची ॥ अग्रेंज्यांचीनिग्रहभाले ॥ तेविनिघाले ॥ कदनकरायामदनशु·
भांगीं ॥ भणंगशिवतो अंगनकेला ॥ यदर्थचरणावरीचाळविला ॥ कुंजवनीं·
स्मरसंजिवनीच्यामंजुळमंजुळतेजपजपती ॥ पैंजणअंदुपैजबोलती ॥ तुरेते
थिनेपुरेंवाजती ॥ छननंछननंआलापगाती ॥ तननंतननंमृदंगझल्लरी ॥ सन

नंसननंविमानघंटा॥ घननंघननंरागोत्थारी ॥ हृदयविदारी॥ स्फरीआस्फरी-
घेउनिवास्फरी॥ गातस्फस्वरीं ॥ किन्नरिघेकरीमहाहुन्नरी ॥ चित्तहरीनीविर-
क्तयोगी सक्तकरीयाकामयुक्तहे श्वेतरूप पक्ष्यांचीं युग्में वृक्षावरुनी पक्षपस
रुनी मन्मथक्रीडाकरिती वेडा॥ वेडाउनियांउन्मत्तस्त्रिया करींदाउनीरवदरव
दहांसती ॥ वसनआणिकुसकसनफेडुनी ॥ आसनेंदाविती चोऱ्याशींची॥ ना
मलीला॥ सेउनिदाविनिनानालीला ॥ कामकलीला खुलवावयास वपुहींउघ
ड्याकिती एकत्या त्यक्तलूगड्याधीटधांगड्याधांगडधिंगा आंगमोडुनी पिंगा-
देतीं ॥ अनंगाचिपारंगाघेउनिरंगदाउनी फंदमांडिला ॥ छंदतालस्वर थैथैथैथै
मंद मंदहें नृत्यकरीती गंधफुलांचेगेंद घेउनी ॥ भारमदेंबहुमार मारिती ॥ वारं
वारतरवारीचे वारपराचेंहृदयवेधिती ॥ बुद्धीजाउनिशुद्धीहरिती युद्धींजोपर
शूरचजेसाशकतेसाधीरवीरतो निधीमहीचाअधीस्वाधिन नव्हेपराधिन
अधिष्ठानेंनिश्चेष्टितमन निष्ठब्रह्मींशिष्टवाक्य ॥ योगवसिष्ठेंग्रंथाचित्याअ
र्थग्रंथींचित्ज्जडछेदुनि अखंड निर्गुणसमाधिसाधीअबाधीतस्फरवरमा
धिशाच्या अनुग्रहेंनिग्रहचिअंतरीं आवरीलेत्यामन्मथआरिला॥ श्रीश०

॥ ११ ॥

त्यांतमुख्यतेरंभारमणी ॥ कंजनेत्री कुंजरगमनी पुढेंपातलीनेमादमनी ॥ चं
चलाक्षितेअचलांतूनी ॥ कंदुकाकृतीबंधुकाननें ॥ नेमसंदुकालक्षलाउनी॥
निकटजाउनी ॥ स्नेहदाउनी ॥ तपोधनाचीउपासनाने ॥ वस्य कराया हास्यक
रुनी विकसितवदना ॥ मदनऋषीविमिष्टमिष्टशागोष्टिवदेपरिदुष्टअंतरीं॥
जसीकातरी एकांतीतेकांताबोले कांतायेथेंनदिसेतुमची कांतीअसिकांअ
कांतवीली॥ नबोलाचीकांअबोला हा आह्मासींधरिला ॥ असेकसेंतुम्हीं
नत्वचेन्ते कठोरचित्तें॥ तुह्माजनाचीतापसाची कापसासममृदुअसावी॥ हृ
दयींनिरंतरशष्कवचनें ॥ मिथ्याअतिथ्याचीरीती॥ स्नेहभरीतसामोरेजा
उनीं ॥ बसाउठाहेंकांहिंचनाहीं॥ परास्त्रियत्वांदूरअसावें॥ ईश्वरआज्ञातीस
सुसावें॥ भजनद्वारेंनित्यधसावें॥ ब्रह्मीं आपपरतुह्मानसावें ॥ कारणागणी
कसेउगेंअसावें॥ समर्थनपहेंकिमर्थकरितां ॥ उद्दंपीतांभवअनर्थसारितां॥

व्यर्थ देह दंडुनि कां मरतां ॥ काय नला भोग्य स्त्रिया भोगितां ॥ या कां मागें मागें स रतां ॥ छी छी मूर्खें गच्छ गच्छ तुं ॥ ॥ गच्छ गच्छ तृण तुच्छ आह्मातें ॥ निरीवरी- तूं वरी धरीसी परि निरिच्छा माझी स्वच्छ वासना ॥ हरिचें देणें अद्भुत केणें ॥ खरें एक मुनिवारें पेउनि जिवा सकां ह्मा भासदेसी ॥ तनु क्षेत्रा सी बहु त्रास वीसी ॥ काय इच्छी मन अशांत पालें शांतपणें हें अपूर्व दिसतें ॥ पूर्व वयीं हे जे विल्या वीण आंचवणे हें ॥ से विल्या विण स्वाद सांगणें ॥ श्लेष्मा द्रव ही उपद्रव मानुनी घ्राण छेदनें हर्षें हर्षें उपजल्या विण बारसें करणें ॥ कारितां हर्ष ह्मणा वाजे सा ॥ तैसा तुमचा पृथक् छंद हा ॥ प्रथम वई वैराग्य पिसें हें दिसों लागलें ॥ योगमिसें दद्रोग असा हा ॥ विश्वासें मीं यथा सांग सांगतें तुह्मातें ॥ ऐक खरें हें श्रीशुकराया ॥ शोक हराया लोकतराया ॥ कोकपुस्तका घोक घोक तूं असे तेथिंचा विषय इंद्रियां ॥ जोड घोलुनी कोड कौतुकें गोड गोड रति सुखासि सोडुनि ॥ वोढ तपाची ह्माड खोड ही सोड सोड निग्रह मनाचा मद्म मनाचा मार्ग धरावा स्वर्ग अर्गळा बार्गळ चित्तें बाष्कळ पुष्कळ वदतां वकूनें ॥ नव्हे चित तो शुकका मानुरिला ॥ श्रीशुकयोगींद्रानें रंभेचा गर्व हरिला ॥ ॥ ॥ ॥

॥ १२ ॥

तरी च येथें जन्मा यावें ॥ तरुण कुच हृदयीं पेटघ्यावे ॥ मन्मथ सरिता तरुनी जावें ॥ तरणी संगें निःसंग व्हावें ॥ व्यर्थ कां तारुण्य हरावें ॥ तृणासनाला काय करावें ॥ सुख मंदीरीं मंचकीं भरावें ॥ गाढालिंग शयन करावें ॥ मुख अमृताचें स्वाद हि घ्यावे ॥ येथें दडुनी किती सडावें ॥ शीत वातें हुडहुड व्हावें ॥ खुड खुड वाजतिदंभ स्वभावें ॥ इंद्रीयानीं किती रडावें ॥ ह्मणाल कांत्वा आह्मा छळावें ॥ हितोपदेशाना चिचिडावें ॥ भोग सुखाला ऐक्य व्हावें ॥ गृहाश्रमानें श्रमा हरावें ॥ ज्या प्रीत्यर्थ तप आचरावें ॥ षड्रस सेउनि तृप्त असावें ॥ जिवात्मयातें तोषवावें ॥ नकळे जरि कोंचि कां पुसावें ॥ अहा कपाळा किती हसावें ॥ गोवळ वचनें व्यर्थ फसावें ॥ श्रीगुरु तुमचा कृष्ण हि भोळा ॥ सोळा सहस्र केल्या गोळा ॥ आणखीं त्या गौळणिचा मेळा ॥ भोंवत्या अबला सुंदर सबला ॥ इतुक्या भोगुन ब्रह्मचारी ॥ झुकवीलें तुज सर्व प्रकारीं ॥ बरें विचारीं ॥ वित्तरागी कैवल्य

